**प्रकल्प प्रवर्तक मे. डालमिया (भारत) ग्रीन व्हिजन लिमिटेड, बर्जर टॉवर, भूखंड क्रं.सी-०१ए/२, २रा माळा, सेक्टर १६बी, नायडा, गौतम बुध्दा नगर, उत्तर प्रदेश - २०१ ३०१ यांच्या प्रस्तावित सिमेंट उत्पादन क्षमता:- सिमेंट - ६.० दशलक्ष टीपीए [(लाईन -I/टप्पा -I - ३.० दशलक्ष टीपीए) आणि लाईन-II/ टप्पा -II – ३.० दशलक्ष टीपीए)] आणि २,०००.० केव्हीए [(लाईन -I/टप्पा -I - २ x ५०० केव्हीए आणि लाईन-II/ टप्पा -II – २ x ५०० केव्हीए) उत्पादन क्षमता प्रकल्प गांव- निमगाव खलू, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा- अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे उभारणीच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मे. डालमिया (भारत) ग्रीन व्हिजन लिमिटेड, बर्जर टॉवर, भूखंड क्रं.सी-०१ए/२, २रा माळा, सेक्टर १६बी, नायडा, गौतम बुध्दा नगर, उत्तर प्रदेश - २०१ ३०१ यांच्या प्रस्तावित सिमेंट उत्पादन क्षमता:- सिमेंट - ६.० दशलक्ष टीपीए [(लाईन -I/टप्पा -I - ३.० दशलक्ष टीपीए) आणि लाईन-II/ टप्पा -II – ३.० दशलक्ष टीपीए)] आणि २,०००.० केव्हीए [(लाईन -I/टप्पा -I - २ x ५०० केव्हीए आणि लाईन-II/ टप्पा -II – २ x ५०० केव्हीए) उत्पादन क्षमता प्रकल्प गांव- निमगाव खलू, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा- अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे उभारणीच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी

मंगळवार, दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शांताई लॉन्स, नगर-दौंड रस्ता, सांगवी फाटा, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

उप प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सदस्य पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

Shinde

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. डालमिया (भारत) ग्रीन व्हिजन लिमिटेड, यांच्या प्रस्तावित सिमेंट उत्पादनाच्या प्रकल्पाबाबतचा जाहिर लोक सुनावणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्राथमिक मान्यता (ToR) दिनांक १९-१२-२०२४ रोजी प्रदान केला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि.२९/०४/२०२५ रोजी आयोजित करण्याबाबत

मान्यता देण्यात आली. मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. ई-२६ दि. ०३/०४/२०२५ रोजी खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

**२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर. - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २७-०३-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस

अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर.
२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर.
४) उप विभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर, जिल्हा - अहिल्यानगर.
५) तहसीलदार, तहसील कार्यालय, श्रीगोंदा, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा- अहिल्यानगर.
६) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये- निमगाव खलू, सांगवी दुमाला, गार, शिपलकरवाडी, कौठे, काष्टी, आनंदवाडी, अजनूज, आर्वी, अनगरे, आळेगाव, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा- अहिल्यानगर.
७) ग्रामपंचायत कार्यालय- सोनवडी, भोंगळेमळा, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे.
८) नगर परिषद - दौंड, ता. दौंड, जिल्हा-पुणे,

९) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

११) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक.

१२) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, पहिला मजला, हॉल नं.२ व ३, टी.व्ही. सेंटरजवळ, सावेडी, अहिल्यानगर -४१४ ००३

१३) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांना ३२५ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना

असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले व सदरील सुचनांची, आक्षेपांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येऊन बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डींग पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

आयोजकांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याचे आदेशीत केले. तदनंतर काही स्थानिक पुरुष व महिला हे गटाने प्रकल्पाच्या विरुध्द घोषणा देत सभागृहात आले व त्यांनी स्टेजसमोर एकत्रितपणे खाली बसून प्रकल्पाच्या विरुध्द घोषणा देण्यास सुरवात केली. त्यांनी Go Back Dalmia, Go Back Dalmia अशा घोषणा दिल्या. पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांना शांतपणे सादरीकरण ऐकण्याची विनंती केली.

त्यावेळी **प्राध्यापक सुनील माने, राहणार काष्टी, व श्री राकेश कैलास पाचपुते, राहणार - काष्टी** यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचे, तसेच सर्व स्थानिक शेतकरी, स्थानीक

लोक यांचे **बागायत शेती, आरोग्य व पर्यावरण बचाव कृती समिती, घोड-भीमा नदी पट्टा** प्रकल्पविरोधी समितीतर्फे स्वागत केले. त्यांनी स्थानीकांच्या प्रकल्पाच्या विरुध्द भावना तीव्र आहेत, याची नोंद जिल्हा प्रशासन, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी घ्यावी अशी सूचना केली. त्यांनी उपस्थितांना त्यांच्या तोंडी किंवा लेखी सूचना, आक्षेप शांततेने उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यावेळी उपस्थितांनी एकत्रित Dalmia Go Back अशा घोषणा दिल्या.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर पर्यावरणीय मुल्यांकन अहवाल (EIA Report), मराठी व इंग्रजी सारांश मध्ये बरीच माहिती उपलब्ध नसल्याबाबतचा व पर्यावरणीय मुल्यांकन अहवाल स्थानिक भाषेमध्ये नसल्याबाबतचा आक्षेप उपस्थित नागरिकांनी नोंदवला.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी, पर्यावरण विषयक सूचना, टिकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टिकाटिप्पणी नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील.

आयोजक यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधि देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे-**

Shinde

१) **श्री. ऋषिकेश धनसिंग भोईटे, राहणार-सांगवी दुमाला, तालुका-श्रीगोंदा** - मी याच परिसरात शेती करतो. त्याच प्रमाणे माझा दुग्धव्यवसायही व गाय आहे. तरी माझ्या वतीने आणि स्थानिक ग्रामस्थांच्यावतीने या प्रकल्पास विरोध असून हा प्रकल्प येथे होऊ देऊ नका अशी आमच्या सर्व ग्रामस्थांची विनंती आहे.

२) **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील, राहणार-कवठा, मुक्काम पोस्ट-शिपलकरवाडी, तालुका - श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर, अध्यक्ष, बागायत शेती, आरोग्य व पर्यावरण बचाव कृती समिती, घोड-भीमा नदी पट्टा** - यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीचे सर्व ग्रामस्थ, शेतकरी व शेतमजूरी यांचेतर्फे स्वागत केले.

अ) त्यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाबाबतचा ईआयए अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल आम्हांला उपलब्ध करण्यात आला. मात्र आता जे सादरीकरण दाखविण्यात आले, त्यातही चुकीच्या गोष्टी दाखविण्यात आलेल्या आहेत. आमच्या गावात ही कंपनीचे

अधिकारी/कर्मचारी आलेले नाहीत. आमच्या ग्रामस्थांबरोबर कुठलीही बोलणी केलेली नाहीत.

कंपनीने ईआयए अहवालातील ६७७ पानावरती प्रस्तावित प्रकल्पाचा लेआऊट दिलेला आहे. तेथे कंपनीने सुमारे ८३ एकर क्षेत्र दिलेले आहे. त्यात गट नंबर्स दिलेले आहेत. येथे माझ्याबरोबर ते गटनंबर धारक शेतकरी आलेले आहेत. त्यांनी कुठल्याही प्रकारे म्हणजे गहाणखत, साठेखत, लीज, भूखंड विक्री संबंधित गट नंबर्सबाबत MoU कंपनीबरोबर केलेला नाही. म्हणजे त्या शेतक-यांनी त्यांच्या शेतीचे संबंधित गट नंबरचे क्षेत्र या कंपनीला विकलेले नाहीत. त्या शेतक-यांची पुर्वपरवानगी न घेता त्यांचे वडिलोपार्जित शेती गट नंबर कंपनीचे आहेत असा ले-आऊट तयार करुन खोटी माहिती ईआयए अहवालात देऊन कंपनीने शासनाचीसुध्दा फसवणूक केलेली आहे. जर ३९ एकर जर सोडले, कारण शांताई कन्सल्टन्सी संस्थेशी कंपनीचा MoU आहे. मात्र शासनाच्या वेबसाईटवर त्या गट नंबरबाबत कुठलीही माहिती नाही. तसेच डालमिया कंपनीने त्यांना कुठलेही कागदपत्रे दिलेली नाहीत.

Shinde

श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील यांनी ज्या शेतक-यांचे गट नंबर कंपनीने अहवालात दिले, ते कंपनीला विकलेले नाहीत, अशा उपस्थित असलेल्या संबंधित शेतक-यांना जागेवरच उभे राहण्याची विनंती केली. सदरहू कंपनीस शेतक-यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांच्या शेताचे गट नंबर अहवालात लिहिण्याचा काय अधिकार आहे? म्हणजे या कंपनीचा प्रथम पायाच चुकीचा आहे. जर कंपनीकडे प्रकल्प उभारणीस जमिनच नाही, तर ही जनसुनावणी खोटी आहे. तर स्थानिकांची मागणी आहे की ही जनसुनावणी होऊच नये अशी मी बाधित शेतक-यांतर्फे शासनास विनंती करीत आहे. तरी ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

त्यावेळी उपस्थितांपैकी खाली बसलेल्या गटाने Dalmia Go Back च्या घोषणा दिल्या. त्यांनी कंपनीच्या अधिका-यांनी याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली.

त्यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी यांनी प्रकल्प प्रवर्तक याबाबत स्पष्टीकरण देतील असे सांगितले.

श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील यांनी मत मांडले की जर पायाच मजबूत नाही, तर इमारत कशी बांधणार आहात? तरी ही जनसुनावणी त्वरित रद्द करण्यात यावी. कारण ज्या जमिनीवर प्रस्तावित प्रकल्प उभारणी होणार आहे, त्या जमिनीबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या जमिनीची मालकी त्यांच्याकडे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आहे हे कंपनीने दर्शविले पाहिजे. त्यांनी ३९ एकर क्षेत्राचा फक्त MoU फक्त आहे. मात्र त्यात कुठल्याही भूखंडाचा गट नंबर लिहिलेला नाही. आमचा शेतकरी गोरगरिब आहे. त्याला यातील व्यवहार कळत नाही.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली या मुद्द्यांवर प्रकल्प प्रवर्तक हे उत्तर देतील. त्यावेळी उपस्थितांनी प्रथम प्रकल्पाच्या अधिका-यांनी उत्तर देण्याची मागणी केली.

श्री शिपलकर पाटील यांनी परत मागणी केली की ज्या जमिनीवर प्रस्तावित प्रकल्प उभारणी होणार आहे, त्या जमिनीबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या जमिनीची मालकी त्यांच्याकडे कोणत्या

Shinde

ना कोणत्या स्वरुपात आहे हे कंपनीने दर्शविले पाहिजे. तसा कायदा आहे. जर काही लोकांनी जमिनी दिल्यात, तर कोणी दिल्या, त्याचे गट नंबर बैठकीत देण्यात यावेत. आमची साधी मागणी आहे की जर डालमियाने जी जमिन घेतलेली आहे, त्यांनी ज्या जमिनीचा मालकी हक्क मिळविलेला आहे, ते भूखंडाचे गट नंबर सभागृहातील स्क्रीनवर दाखविण्यात यावेत.

कंपनीने शेतक-यांनी न विकलेल्या शेताचे गट नंबर्स लिहिलेले आहेत. जर हा ईआयए खोटा असेल, तर ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

३) श्री विठ्ठल काकडे, राहणार-काष्टी, ता. श्रीगोंदा स्थानिक शेतक-यांना न्याय देण्यासाठी व प्रस्तावित डालमिया प्रकल्पास विरोध करण्यासाठी स्थानिकांनी **बागायत शेती, आरोग्य व पर्यावरण बचाव कृती समिती, घोड-भीमा नदी पट्टा** नावाने स्थापन केलेली असून त्या कृती समितीचे **अध्यक्ष श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** हे असून **प्राध्यापक सुनील माने, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर हे त्या कृती समितीचे सचिव** आहेत.

तरी त्यांनी विचारलेल्या सर्व मुद्द्यांचे कंपनीकडून स्पष्टीकरण करण्यात यावे. तसेच जेथे आवश्यक असेल तेथे शासनाने/पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीने उत्तर, स्पष्टीकरण द्यावे. नंतरच ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीत वैयक्तिक प्रश्न सुरु करण्यात यावेत.

त्यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की प्रकल्पाच्या भूखंड मालकीच्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली आहे. सदरहू जमिन अधिग्रहण मुद्दा हा महसूल विभागाच्या अखत्यारित येतो. आपण उपस्थित केलेले आक्षेप हे शासनास कळविण्यात येईल. ही जनसुनावणी ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आहे. प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांच्या ज्या काही पर्यावरण विषयक सूचना, विचार, टीकाटिप्पणी अथवा आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. त्या सर्वांचीच नोंद घेण्यात येईल.

**<u>श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,</u>** यांनी मत मांडले की मला व येथील स्थानिक शेतक-यांना माहित आहे की ही पर्यावरण

विषयक जाहिर जनसुनावणी आहे. डालमिया कंपनी आमची नाही. पण येथील जिल्हा प्रशासन आमचे आहे. येथे गट नं. २७३ चे शेतकरी बसलेले आहेत. खाजगी कंपनी सुरु करण्यासाठी १००% जमिन अधिग्रहित असणे जरुरीचे आहे. काही ठिकाणी फक्त पाचशे रुपयात MoU करण्यात आलेला असेलही, पण खरेदीखत नाही. जर जमीनीची मालकीच कंपनीची नाही, तर प्रकल्प कसा उभा करता येईल? तर या ईआयए अहवालास आणि या जनसुनावणीला काहीही अर्थ नाही. जर कंपनीचे अधिकारी याबाबत स्पष्टीकरण देत नसतील, तर आम्हांला काहीही वाटत नाही. पण जिल्हा प्रशासन हे आमचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा प्रशासन हे फक्त औपचारिकता (formality) पाळण्यास आलेले आहेत का?

**४) श्री विनायक पांडुरंग मगर, राहणार-गार गाव, तालुका-श्रीगोंदा-**

यांनी येथे मत मांडले की, वस्तूस्थिती विचारात घेऊनच जनसुनावणी प्रक्रिया करण्यात यावी. प्रकल्प ज्या जागेवर विकसित करण्यात येणार आहे, ती जमिन कोणाची आहे, त्या जागेची मालकी कोणाची आहे, एवढाच साधा प्रश्न स्थानिकांचा आहे.

त्यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे स्पष्टीकरण दिले की जमिन अधिग्रहणाबाबतची सद्य स्थितीबाबत स्थानिक लोक महसूल विभागाकडे विचारणा करु शकतात.

**५) श्री श्रीकांत मच्छिंद्र मगर, राहणार-गार गाव, तालुका-श्रीगोंदा, -**

असे निदर्शनास येते की जमिन अधिग्रहण कंपनीने १००% केलेले नाही. कंपनी सांगते की MoU झालेला आहे. तर स्थानिक लोक सांगतात की MoU झालेलाच नाही. फक्त ५०० रुपयाच्या स्टँप वर झालेला आहे. तर याठिकाणी साठेखत, खरेदीखत किंवा शासकीय नोंदणी होणे आवश्यक आहे. येथे गट नं. २६२, २६३, २६६, २६८, २६९, २७२ चे शेतकरी त्यात १२ एकर क्षेत्र आहे. तर २७३, २७४, २७५, २७६६, २७७, २७८ या गट नंबर क्षेत्राचे खरेदीखत झालेले नाही. जर साठेखत, खरेदीखतच नाही, तरीही प्रकल्प उभारणीची जनसुनावणी घेण्यात येत आहे. येथे कंपनीने शासनाची फसवणूक केलेली आहे. तरी कंपनीच्या विरुध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, तसेच या कंपनीचे जे

पर्यावरण सल्लागार जे पर्फेक्ट एन्व्हायरो सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस ब्लॅक लिस्ट करण्यात यावे.

येथे आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती येथे मत मांडले की ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी असून बैठकीत स्थानिकांनी, प्रकल्पग्रस्तांकडून उपस्थित करण्यात आलेल्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यासाठीच आहे.

त्यावेळी **<u>श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,</u>** यांनी मत मांडले की ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी व उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यानंतरच परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. ही कंपनी फ्रॉड आहे, त्यामुळे ही जनसुनावणी खोटी जनसुनावणी आहे.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की शासनाने प्रस्तावित प्रकल्पाबाबतचा टीओआर - प्राथमिक अहवाल मंजूर केलेला आहे. त्यामुळेच ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

त्यावेळी **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी सांगितले की कंपनी आमची नाही. जिल्हा प्रशासन हे आमचे मायबाप आहेत. प्रथम हा जमिन अधिग्रहणाचा मुद्दा सोडविण्यात यावा. येथे आमचे गोरगरिब शेतकरी आशेने आलेले आहेत. येथे स्पष्टीकरण देण्यात यावे की कंपनीच्या मालकीची जमिन आहे किंवा नाही? जर असेल, तर खरेदीखत स्क्रीनवर दाखविण्यात यावे. जर नसेल, तर ही जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी.

येथे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जनसुनावणीनंतर शासनास अहवाल सादर करण्यात येतो. त्यावेळी पेपर्स सादर करण्यात येतात.

**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी मत मांडले की गुंठाभर जमिन नसेल, तरीही तुम्ही जमिन आहे असे सांगणार का?

६) **श्री विनायक मगर, राहणार-गार गाव, तालुका-श्रीगोंदा,** यांनी विचारणा केली की आमच्या जमिनी घेण्यासाठी जनसुनावणी लावणारी कंपनी कोण आहे?

यावेळी उपस्थितांनी सदरहू जनसुनावणी प्रक्रियेचा जाहिर निषेधाच्या घोषणा दिल्या.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आम्ही काहीही खोटे बोलत नाही. प्रस्तावित प्रकल्पाचा ले-आऊट आहे. ज्यावेळी आम्ही शासनाकडे जनसुनावणीचे इतिवृत्त, आपल्या सूचना/आक्षेप सादर करतो, तोपर्यंत आम्हांला जमिन ही पूर्णपणे विकतच घ्यावीच लागते. त्याशिवाय पर्यावरण अनुमती ही प्रदान करण्यात येत नाही.

यावेळी <u>**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील -**</u> यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की कंपनीने जो काही एम.ओ.यू. केला असेल, तो आता स्क्रीनवर दाखविण्यात यावा, म्हणजे त्यात कंपनीने केलेल्या चुका दाखविता येतील. ही जर जनसुनावणी आहे, तर कंपनीस एम.ओ.यू. दस्तावेज स्क्रीनवर दाखविण्यास/प्रकाशित करण्यास काय अडचण आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याअगोदर सर्व जमिन विकत घेणे हे आम्हांला बंधनकारक आहे.

त्यावेळी **<u>श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,</u>** यांनी विचारणा केली की कंपनी आमची नाही. जिल्हा प्रशासन हे आमचे मायबाप आहेत. तर कंपनीचे कागदपत्र बघण्याचा आम्हांला अधिकार आहे की नाही? जर कंपनीकडे जमिनच नाही आणि शेतक-यांनी जर जमीन दिली नाही, तर कंपनीचे नियोजन काय आहे? तरी अगोदर कंपनीने एमओयू स्क्रीनवर दाखवावा. त्यांनी आक्षेप नोंदविला ईआयए अहवालात कोठेही कंपनीने एमओयू लावलेला नाही, मात्र शासनाच्या वेबसाईटवर फक्त दोन पानी एमओयू दिलेला आहे. कंपनी प्रशासनाचा फसवणूक (fraud) करण्याचा मानस दिसत आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक हे हिन्दीमध्ये उत्तर देत असताना उपस्थितांनी मराठीत उत्तर देण्याची मागणी केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक सांगत आहेत की जर स्थानिक शेतक-यांनी जमिन दिली नाही, तर आम्ही येथे प्रकल्प उभारणार नाही.

त्यावेळी **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी मत मांडले की मग या जनसुनावणीची काहीही गरजच नाही. दौडला एका शेतक-यांनी जमिन दिली नाही, तर त्यासाठी त्या शेताच्या चारी बाजूने कुंपण घालून या कंपनीने तेथे प्रकल्प सुरु केलेला आहे.

७) **श्री विठ्ठल काकडे, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा,** आता कंपनीच्या अधिका-याने जे आश्वासन दिले, त्याबाबत त्यांचे नाव, हुद्दा याची नोंद घेऊन त्यांनी दिलेल्या आश्वासनाचा ठराव येथे मंजूर करण्यात यावा असे मत मांडले. **प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की जोपर्यत जमीन आम्हांला उपलब्ध होणार नाही, तोपर्यंत आम्ही १००% प्रकल्प उभारणारच नाही.** तसा ठराव करण्यात यावा, अशी सूचना देण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी हिंदीतून उत्तर देताना सांगितले की कोणत्याही प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक आहे. प्रकल्पास जमीन देणे हे आपली इच्छा असेल तरच ती द्या. जमीन अधिग्रण कंपनी जबरदस्तीने करु

शकत नाही. ही बैठक पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आहे. त्यासाठी ही जनसुनावणी बंधनकारक आहे.

**८) श्री राकेश कैलास पाचपुते, राहणार-काष्टी, तालुका- श्रीगोंदा** - यांनी विचारणा केली की जर प्रकल्पास जमिनीची गरज असल्यास, प्रकल्प प्रवर्तकांनी जमीन अधिग्रहित करण्यासाठी प्रथम स्थानीक शेतक-यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. ती त्यांनी घेतलेली नाही. त्यांनी अध्यक्ष यांना विचारणा करताना सांगितले की स्थानिक शेतक-यांचे असे म्हणणे आहे की पर्यावरण अनुमती घेण्यापूर्वी शेतक-यांची जमिन अधिग्रहण करण्याची परवानगी घेणे गरजेचे होते. जर जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यावरण अनुमती प्रदान करण्यासाठी नुसता अर्ज दाखल करण्यात आला, तर पर्यावरण अनुमती जिल्हाधिकारी कार्यालय देईल का, तर उत्तर आहे नाही देणार. कारण त्यासाठी नियमाप्रमाणे सर्व प्रक्रिया पार पाडाव्याच लागतील. पण जर कंपनीने आमच्या स्थानिक शेतक-यांची जमिन अधिग्रहण करण्याची परवानगी घेतलेलीच नाही.

येथे आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे स्पष्टीकरण दिले की शासनाने प्रस्तावित प्रकल्प विकसित करण्यासाठी टी.ओ.आर. संमत केलेला होता. त्यानुसार ही पर्यावरणीय जनसुनावणी मा. जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या संमतीने आयोजित करण्यात आलेली आहे.

**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी येथे मत मांडले की कंपनी जमिन अधिग्रहणाबाबत काहीही उत्तर देत नाही. जर ही जनसुनावणी स्थानिक शेतकरी, स्थानिक नागरिक, गोरगरिबांवर जबरदस्तीने लादण्यात येत असेल, तर त्याचे फार मोठे परिणाम भोगावेच लागतील. गरिब शेतक-यांच्या फसवून आम्ही जमिन देऊ देणार नाही. आपण सर्वांनी पाहिलेले आहे सिमेंट प्रकल्पामुळे गावच्या गावे उध्वस्त झालेली आहेत. प्रकल्प प्रवर्तक बैठकीत सांगतात की जर जमिन मिळाली नाही, तर प्रकल्प उभारणार नाही. तर ते एमओयु का स्क्रीनवर प्रकाशित करत नाहीत? मग ३९ एकर जमिन का घेतली?

कंपनीच्या सांगण्यावरुन तयार करण्यात आलेला हा ईआयए अहवाल हा बोगस असून गैरलागू झालेला आहे. जर प्रकल्प प्रवर्तक सांगतात की ते पुढे जाणारच नाही, तर कसली जनसुनावणी आपण घेत आहोत. जनसुनावणीचा उद्देशच आता बाजूला झालेला आहे.

मा. सुप्रीम कोर्टाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्णयांनुसार चौकशी अधिकारी येथे जिल्हाधिकारी, तसेच विविध शासकीय अधिकारी-येथे प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी हे सुप्रीम कोर्टाचे चक्क डोळे असतात. मा. जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी हे समाजाचे विश्वस्त आहेत.

तरी ही कार्यरत जनसुनावणी प्रक्रिया त्वरित बंद केली पाहिजे आणि अहवालात असे लिहिले पाहिजे की कंपनीच्या जबाबदार अधिका-याने जनसुनावणीत सर्वांसमक्ष असे सांगितलेले आहे की आमच्याकडे जागा नाही आणि जोपर्यंत जागा मिळत नाही, तोपर्यंत आम्ही प्रकल्प राबवू शकत नाही. प्रकल्प अधांतरी बांधता येत नाही, म्हणून हा प्रकल्प आताच्या आता रद्द व्हायला पाहिजे.

भविष्यात आपल्याला कुठेही जायची गरज नाही. आपण अहवाल बारकाईने पाहिला तर आपणास अहवालात लिहावे लागणार आहे, कारण प्रकल्प उच्च न्यायालयात गेल्यास, हे प्रश्न तेथेही उपस्थित होणार आहेत. तरी अहवालात लिहावे लागणार आहे की कंपनीकडे प्रकल्प उभारणीसाठी जागा नाही. एवढेच नाही तर कंपनीच्या मूळ अहवालात प्रकल्पाचे कार्यक्षेत्र विशिष्ट जागा, गट नंबर न दाखवता "संपूर्ण गाव - Whole Village" असे लिहिलेले आहे. तरी हा ईआयए अहवाल गैरलागू होत आहे. जर प्रकल्पास जागाच नाही, तर हा अहवाल हा बेकायदेशीर ठरतो. कंपनीच्या अहवालाबाबत कंपनी अधिका-यांना काहीही स्पष्टीकरण देता येणार नाही. तरी कृती समितीच्या वतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की ही जनसुनावणी त्वरित थांबवावी. कारण जागाच नाही, तर हा अहवाल बेकायदेशीर ठरतो. जर अहवाल बेकायदेशीर आहे, तर जनसुनावणीची पुढील प्रक्रियासुध्दा बेकायदेशीर होते.

Shinde

९) <u>मेजर जालिंदर पाचपुते, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा, यांनी</u> आक्षेप नोंदविला की, बैठकीत जमिन अधिग्रहणाबाबत बरीच चर्चा झालेली आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जर जमिन अधिग्रहित करण्यात आली नाही, तर प्रकल्प करणार नाही. मग उद्या माझी जमिन जर मी मान्य केलेल्या दराने, मला जर पाच लाख एकराने प्रकल्प प्रवर्तक विकत घेत असेल, तर ती मी विकणार. ही जनसुनावणी आहे, येथे जनतेच्या भावना लक्षात घ्यायला पाहिजेत. जनतेचा विचार, जनतेचा प्रश्नाचाच विचार करण्यात यावा. जमिन अधिग्रहणाबाबत खूपच चर्चा झालेली आहे.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनतेचे प्रश्नच आपण इतिवृतात घेणार आहोत.

**१०) श्री विनायक मगर, <u>राहणार-गार गाव, तालुका - श्रीगोंदा,</u>** यांनी जर आपण जागाच घेतलेली नाही, तर प्रकल्प हा काल्पनिक आहे का? त्यावेळी **<u>श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,</u>** यांनी मत मांडले की जिल्हाधिकारी साहेबांच्या सर्व लक्षात आलेले आहे.

Shinde

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की जमिनीच्या मुद्दाबाबत भरपूर चर्चा झालेली आहे. तो मुद्दा बाजूला ठेऊन प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी सांगितले की आमचे वकील आव्हाड साहेब येथे आलेले आहेत. आपले जे मुद्दे आहेत, त्याचे स्पष्टीकरण झाल्याशिवाय ही जनसुनावणी प्रक्रिया थांबणार नाही. आमचा विश्वास जिल्हा प्रशासनावर आहे. आजच्या जनसुनावणीचे सन्माननीय अध्यक्ष आहेत.

११) **ॲड. आव्हाड यांनी** मत मांडले की ही पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया पुढे चालूच शकत नाही. कारण आताच प्रकल्प प्रवर्तकांनी मा. जिल्हाधिकारी यांच्या समक्ष, साक्षीने सांगितलेले आहे की जोपर्यंत आमच्याकडे स्थानिक शेतकरी जमिन देत नाही, तोपर्यंत आम्ही कोणताही प्रकल्प सुरु करणार नाही. म्हणजेच हा जो प्रकल्प चालू करण्याचे धाडस होते, ते कोणत्याही पायाशिवाय (base/foundation) होते. म्हणजेच

तरी मा. अध्यक्ष यांनी त्याच्या अखत्यारित असलेल्या अधिकाराचा वापर करुन प्रकल्प प्रवर्तकांनीच मान्य केलेल्या जागा नसल्याच्या मुद्दयांवर ही जनसुनावणी प्रक्रिया त्वरित थांबविण्यात यावी.

१२) <u>**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,**</u> यांनी सांगितले की आम्ही सुरवातीपासून सांगत आहोत की हा अहवाल बोगस असून ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. ही जनसुनावणी पुढे चालू ठेऊ नये.

१३) <u>**श्री ऋषिकेश धनसिंग भोईटे, राहणार-सांगवी दुमाला, तालुका-श्रीगोंदा -**</u> मा. जिल्हाधिकारी हे आमचे माय बाप आहेत. तरी जनसुनावणी प्रक्रिया ही पुढे चालू ठेऊ नका. आमचा सगळा बागायती भाग आहे. तरी सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचित (Notified) औद्योगिक क्षेत्रात - एम.आय.डी.सी. क्षेत्रात जागा देण्यात यावी. तरी मा. जिल्हाधिकारी यांना विनंती की, या प्रकल्पास कुठल्याही परिस्थितीत परवानगी देण्यात येऊ नये.

अन्यथा प्रकल्प उभारणीस जेसीबीने जे खड्डे खणावे लागणार आहेत, त्यात या क्षेत्रातील तरुण उड्या मारून बसणार आहोत.

१४) **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील -** यांनी येथे मत मांडले की श्रीगोंदा तालुक्यासाठी नविन एम.आय.डी.सी. सुरु झालेली आहे. तेथे यांना जागा देण्यात यावी. तेथे आम्ही प्रकल्पाचे स्वागतच करु.

१५) **श्री सागर मंत्री, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा,**

आता जो मुद्दा श्री हृषिकेष भोईटे यांनी मांडला, त्याबाबत मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत मार्गदर्शन करावे.

त्यावेळी **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** ही बेकायदेशीर जनसुनावणी चालू ठेवता येते का याबाबत विचारणा केली. कारण येथे समोर लाडक्या बहिणी, माता आलेल्या आहेत, त्यांच्या नांवावरिल जमीन त्यांच्या परवानगीशिवाय कंपनीने ते भूखंड गट नंबर कंपनीने ईआयए अहवालात नोंदविलेली आहे. जर कंपनीच्या मालकीचे ते भूखंड क्षेत्र दाखवितात, तर हा ईआयए

अहवाल बेकायदेशीर आहे. या बेकायदेशीर अहवालावर जनसुनावणी कशी आयोजित करता येईल?

१६) **श्री सतीश मुकुंदा शिपलकर, राहणार-हनुमंतवाडी, तालुका-श्रीगोंदा,** कंपनीच्या ईआयए अहवालात आमचे क्षेत्र हे जिरायती दाखविलेले आहे. तरी मा. अध्यक्ष जे या विभागाचे उप जिल्हाधिकारी आहेत, त्यांना विनंती आहे की येथील तहसीलदार आणि भूमी अभिलेख अधिकारी यांच्याकडे आमचे क्षेत्र बागायती किंवा जिरायती याबाबत सत्यता पडताळावी.

**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील, -** यांनी उपस्थितांना विनंती केली की ज्या रजिस्टवर स्वाक्षरी घेण्यात येत आहे, ते शासकीय आहे. त्यावर स्वाक्षरी करण्यात यावी. ते कंपनीचे रजिस्टर नाही. आपण येथे जनसुनावणीस हजर होता हा पुरावा आहे. तरी स्वाक्षरी त्या रजिस्टरवर करण्यास हरकत नाही.

१७) **श्री केशव निवृत्ती मगर, उपाध्यक्ष, सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव नागवडे साखर कारखाना,-** आपण येथे प्रस्तावित स्थापन होणारा डालमिया सिमेंट प्रकल्पाच्या विरोधासाठी एकत्रित

आलेलो आहोत. गेले २५ वर्षे मी नागवडे सहकारी साखर कारखान्यात काम करत आहे. त्याठिकाणी आसवणी प्रकल्प (Distillery) आहे. पर्यावरण अनुमती न मिळाल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ८० लाख (ऐंशी लाख) रुपये दंड केलेला आहे. कारखाना आहे १,५०० सभासदांचा. ३,००० टन प्रति दिन ऊस गाळप केला जातो. आमच्याकडे एकच बॉयलर आहे. धुराचा अगदी अल्प परिणाम होतो. या प्रस्तावित डालमिया प्रकल्पात लाखो टन सिमेंटचे क्रशिंग होणार आहे. त्यामुळे प्रदूषण, जनावरांची हानी, शेतीची हानी होणार आहे. मात्र आमचा नागवडे सहकारी साखर कारखाना सभासदाचा आहे. तेथे एक माणूस अर्ज करतो. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तो कारखाना बंद करतो. ती कंपनी पंधरा वर्षे बंद केली. १०-१५ कि.मी परिघातील शेतकरी आमच्या कारखान्यावर जगत आहे.

त्यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आहे. तरी इतर कंपन्याबाबत कुठलेही

मुद्दे उपस्थित करण्यात येऊ नयेत. तसेच प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक काही सूचना, विचार किंवा टीकाटप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. सदरहू प्रकल्पाबाबत शासन स्तरावर निर्णय होणार आहे.

१८) **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील, -** यांनी आक्षेप नोंदविताना मागणी केली की सदरहू कंपनीने अवैधरित्या ईआयए अहवाल सादर केला या मुद्दयाची नोंद घेण्यात यावी.

**आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती -** यांनी येथे सांगितले की जनसुनावणीची पुढील प्रक्रिया सुरु झालेली आहे. प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. त्याची नोंद घेण्यात येईल.

१९) **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील, -** यांनी कंपनीने केंद्र सरकारने पारित केलेले सर्व निकष डावलून अवैधपणे खोटा ईआयए अहवाल सादर केला अशी कबूली प्रकल्प प्रवर्तक यांनी दयावी अशी मागणी केली. या भागाच्या उत्तर दिशेला घोड

कॅनॉल आहे, घोड धरण आहे. पश्चिम भागाला भीमा नदी जाते. तो सर्व परिसर प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषित होणार आहे. त्यावेळी उपस्थितांनी डालमिया गो बॅकच्या घोषणा दिल्या. त्यांनी अवैध ईआयए अहवाल सादर केला म्हणून संबधित प्रकल्प प्रवर्तकांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जर पर्यावरण अनुमती मिळालीच नाही, तर प्रकल्प स्थापित करताच येणार नाही.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्पास जमिन मिळालीच नाही, तर प्रकल्प उभारणी होणार नाही असे स्पष्टीकरण दिलेले आहे. तरी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याची इतरांना बोलण्याची संधी देण्याची सूचना केली.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील यांना विचारणा केली की आपण जो पहिला प्रश्न विचारला, त्याचे उत्तर देण्यात आलेले आहे.

२०) <u>**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,**</u> यांनी अध्यक्षांना विचारणा केली की आमच्या शेतीचा ले-आऊट करण्याचा अधिकार कंपनीस आहे काय?

<u>**अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील यांना आपले गाव कुठले याबाबत विचारणा केली. त्यांनी कौठा गाव हे उत्तर दिले. अध्यक्ष यांनी इतरांना बोलण्याची संधि देण्याची सूचना केली**</u>

शाहूराजे शंकरराव शिपलकर यांनी ईआयए अहवालावर आक्षेप नोंदविताना सांगितले की जर कंपनीची एकही इंच जमिन त्यांच्या मालकीची नसताना त्यांनी स्थानिक शेतक-यांचे गट नंबर आपल्या मालकीचे दाखविलेले आहेत. त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. ते देऊ शकत नाहीत, कारण ईआयए अहवालच अवैध आहे, म्हणून ही जनसुनावणीसुध्दा अवैध आहे असे माझे म्हणणे आहे. त्यांनी मा. अध्यक्षांना त्याबाबतचा पुरावा द्यावा, मी माझी हरकत थांबवितो.

**सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात येऊन ते शासनास कळविण्यात येईल. याबाबत महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग हे उत्तर देईल. तसेच उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावेत त्याची नोंद घेण्यात येईल.

**श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांनी आक्षेप नोंदविला की आठ दिवसांपूर्वी आम्ही स्थानिक उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रत्र सादर करण्यात आलेले आहे. त्यांनी अजूनही त्याबाबत पुढील कार्यवाही केलेली नाही. आम्हांला त्यामुळे शंका वाटते. तरी कंपनीने येथे कबूल करावे की हा ईआयए अहवाल अवैध आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** **श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,** यांना ईआयए अहवाल अवैध असल्याची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येईल असे सांगितले.

२१) **<u>श्री ऋषिकेश धनसिंग भोईटे, राहणार-सांगवी दुमाला, तालुका-श्रीगोंदा,</u>** आम्ही शेतकरी जगाचे पोशिंदे आहोत. जिल्हा प्रशासन हे आमचे मायबाप आहेत. तर आमच्या शेतक-यांची बाजू मांडण्याऐवजी आयोजक हे कंपनीचीच बाजू घेत आहेत.

येथे आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी उत्तर दिले की आपली व कंपनीची बाजू ऐकण्यासाठीच ही समिती गठित करण्यात आलेली आहे. मी अगोदरच सांगितलेले आहे की सदरहू समिती ही प्रकल्पास मान्यता देत नाही, प्रकल्पास विरोधही करत नाही किंवा प्रकल्पाचे समर्थन सुध्दा करत नाही. आपण पर्यावरण विषयक उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त तयार करण्यात येते व ते शासनास सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेते.

२२) **<u>श्री शाहूराजे शंकरराव शिपलकर पाटील,</u>** <u>यांनी सांगीतले की,</u>

अ)मा. अध्यक्ष यांनी सदरहू ईआयए अहवाल अवैध असून शेतक-यांच्या मालकी हक्काच्या जमिनी कंपनीने अवैधपणे त्यांच्या

Shinde

असल्याचे ईआयए अहवालात नोंदिवले हा मुद्दा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल असे सांगितले.

ब) मी माझ्या सूचना/आक्षेप हे स्थानिक उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आलेले आहे. कंपनीने ईआयए अहवाल बनविताना माहिती लपवून चुकीची माहिती दिलेली आहे. त्यामुळे ईआयए अधिसूचना नुसार अनुमती रद्द होऊ शकते.

क) आयएस-५१८२ नुसार हवा प्रदूषणाबाबत पारित केलेल्या निकषानुसार सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील विविध शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स येथील सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

ड) तसेच दौंडची रेल्वे वसाहतीची माहिती घेण्यात आलेली नाही.

इ) एस.आर.पी. (राज्य राखीव पोलिस दल) येथे सर्वेक्षण व माहिती गोळा करण्यात आलेली नाही.

ई) पोलिस प्रशासन संस्थेचे सर्वेक्षण व माहिती घेण्यात आलेली नाही

उ) दौंड तालुक्यातील डाऊनस्ट्रीमची गावे यांनी जाणूनबूजून सर्वेक्षणातून वंचित ठेवलेली आहेत.

ऊ) हा अहवाल जनतेसाठी अप्रामाणिक आहे.

ओ) या प्रकल्पास पर्यावरण विरोधक म्हणून विरोध आहे. दगडी कोळसा प्रकल्पात आणणार आहेत. त्याच्या प्रदूषण नियंत्रणाबाबत काहीही उपाययोजना केलेल्या नाहित.

- दौंड तालुक्यातील व श्रीगोंदा तालुक्यातील काही गावांना EIA Report मिळाला नाही. त्यामुळे तेथील रहिवाशी हरकतीपासुन वंचित राहिले आहेत त्यामुळे EIA Notification चे उल्लंघन आहे.
- स्थानिक लोकांना EIA Report ची माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे EIA अहवाल अप्राप्त आहे. येथील एक नागरिकाने महाराष्ट्र शासनाचा माणुस म्हणुन दिशाभुल करुन नागरिकांकडुन माहिती घेतली.
- आमचा हा भाग १०० टक्के बागायती शेती असुन भारतातील इतर ठिकाणी चालु असलेल्या सिमेंट प्रकल्पामुळे शेतीचे नुकसान झाल्याचे अहवाल आहेत. त्यामुळे सदर उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होणार आहे. त्याबाबत उद्योगाने EIA Report मध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही.

Shinde

- हवा, ध्वनी व पाण्याचे परिक्षण करताना कोणत्याही नियमांचे पालन करण्यात आलेले नाही.
- मराठी व इंग्रजी मधील सारांशामधुन Anticipated Environmental Impact and the Mitigations Measures हा भाग वगळण्यात आलेला आहे. ( श्री. शाहुराजे शिपलकर यांचे प्राप्त अर्ज सोबत जोडले आहे.)
- तसेच अनेक माहिती दिशाभुल करणारी आहे त्यामुळे सदर EIA Report रद्द करावा व सदर जनसुनावणी रद्द करावी अशी मागणी त्यांनी केली.

**२३)प्राध्यापक सुनील माने, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा,-**

ही जनसुनावणी रात्रीच्या २-३ वाजेपर्यंत जरी चालली, तरीही आपण या ठिकाणांवरुन जायचे नाही. गेले महिनाभर ही कृती समिती तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आपापसात चर्चा करुन ईआयए अहवालातील त्रुटी काढलेल्या आहेत. येथे प्रत्येकाला बोलण्याची संधि आहे. तरी शासनाच्या अधिका-यांना, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस आमची विनंती आहे की फक्त मुद्दे मांडा असे सांगू नये. कृपया बैठक संपविण्याची घाई करु नका.

२४) **<u>श्री रमेश परकाळे, राहणार-कवठा, तालुका-श्रीगोंदा,</u>**

लोकांमध्ये या प्रकल्पाबाबत जनजागृती करत असताना असे निदर्शनास आले की प्रभावित क्षेत्रातील अनेक गावांमध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल प्राप्त झालेलाच नाही. या प्रकल्पामुळे सुमारे तीस गावे ही प्रभावित होणार आहेत. मात्र फक्त अकरा गावांनाच हा ईआयए अहवाल प्राप्त झालेला आहे. येथे पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ – पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ चे येथे गंभीर उल्लंघन झालेले आहे.

याबाबत विविध वेळी निर्णय देताना मा. सुप्रीम कोर्टाने गंभीर दखल घेतलेली आहे. कारण येथे Right To Know या कायद्याचे उल्लंघन झालेले आहे. कारण याठिकाणी सर्वांगीण सहभागाचा अभाव दिसत आहे. येथे पर्यावरण सल्लागार असतील, कंपनी असेल किंवा शासकीय विभाग असेल यांचा Right To Participate & Right To Obedience या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन झालेले आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकाराचे येथे उल्लंघन झालेले आहे. तरी या कंपनीस पर्यावरण मान्यता प्रदान करण्यात येऊ नये.

पर्यावरणीय मान्यता दिल्यास हा मुद्दा आम्ही मा. सुप्रीम कोर्टातसुध्दा घेऊन जाणार आहोत.

**मुद्दा क्रं.२ -** प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल आम्हांला स्थानिक भाषा मराठीत उपलब्ध करणे बंधनकारक असतानाही तो स्थानिकांना जाणूनबूजन उपलब्ध करण्यात आलेला नाही. येथे कार्यकारी सारांश अहवाल मराठीत उपलब्ध करण्यात आलेला आहे. त्यात पर्यावरणाचे सर्व मुद्दे घेण्यात आलेले नाहीत. प्रस्तावित प्रकल्पामुळे जे संभाव्य गंभीर धोके होऊ शकतात, त्यांचा यात समावेश नाही आणि जरी सादरीकरण दाखविण्यात आले, त्यातही त्याचा उल्लेख नाही. फक्त ईआयमध्येच संभाव्य गंभीर धोके यांचा उल्लेख आहे. त्यामुळे आम्ही संभाव्य धोक्यांबाबत हरकत कशी घेणार? हे मुद्दे पूर्वी मा. सुप्रीम कोर्टाने विचारात घेतलेले आहेत. सुप्रीम कोर्टाच्या विविध निर्णयानुसार लोकांना त्यांच्या भाषेत, त्यांना समजेल अशा पध्दतीने सांगावे हेच सांगितलेले आहे. मानवाला उच्च जीवन जगण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे या प्रकल्पामुळे प्रभावित होणा-या क्षेत्रातील सर्व

Shinde

प्राण्यांना जगण्याचा अधिकार आहे. आज प्राण्यांच्या वतीने हरकत मांडतो प्रभाव क्षेत्रात जे प्राणी येतात, त्यांचा उल्लेख पूर्णपणे टाळण्यात आलेला आहे. प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात अनेक ओढे, नाले, कालवे, छोटी मोठी वने आहेत. तेथे अनेक प्रकारचे अधिसूचित प्राणी, पक्षी आहेत, त्यांच्यावर काय परिणाम होणार, याबाबत अहवालात काहीच सांगितलेले नाही. तरी प्रस्तावित प्रकल्पास मान्यता दिल्यास या गोष्टी नाहिशा होणार आहेत. तरी प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरणीय मान्यता देण्यात येऊ नये. त्यांना पर्यायी जागेचा विचार करण्यास सांगावे. आमचा भाग बागायती पट्ट्यात येतो. घोड-भीमा नदीमुळे आमचा भाग हा सुजलाम, सुफलाम आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात प्रदूषणाची वाढ होईल. तरी प्रकल्पास या क्षेत्रात मान्यता देण्यात येऊ नये. त्यांना पर्यायी जागेचा विचार करण्यास सांगावे. Maharashtra Town Planning Act, 1966 नुसार अशा प्रदूषणकारी उद्योगांना शेतीक्षेत्रात स्थापित करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे जर या प्रकल्पास परवानगी मिळाली, तर Maharashtra Town Planning Act,

1966 चे उल्लंघन होणार आहे. महाराष्ट्र शासनास मी लक्षात आणू देऊ इच्छितो की, आमचा भाग सुजलाम सुफलाम आहे. आमच्या क्षेत्रात प्राचीन काळापासून जैवविविधता आढळते. तरी प्रस्तावित सिमेंट प्रकल्पास आमचा विरोध आहे.

प्रस्तावित प्रकल्पाने Bio-Diversity Act नुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे, ती त्यांनी घेतलेली नाही. Bio-Diversity Act नुसार या अहवालात अनेक त्रुटी असून अहवाल अपूर्ण आहे. म्हणून या प्रकल्पास पर्यावरण मान्यात देण्यात येऊ नये.

भिमा नदीच्या प्रदूषणाचा अभ्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याव्दारे करण्यात आलेला आहे.

ईआयए अहवाल तयार करताना कंपनीने आजूबाजूच्या परिसरातील पाण्याच्या नमुन्याची चाचणी करण्यासाठी नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले नाही. प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रात साखर कारखाना, एमआयडीसी आणि इतर प्रदूषणकारी उद्योग स्थापन

झाले आहेत. जर हा प्रस्तावित सिमेंट उद्योग सुरू झाला तर आजूबाजूच्या परिसरात प्रदूषण वाढेल.

तरी प्रस्तावित प्रकल्पास आमचा विरोध आहे. तरी उद्योगाने इतरत्र जागा पाहावी.

**२५) ॲड. आव्हाडः-** पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीच्या चर्चेत प्रकल्प प्रवर्तक यांनी कॅमेरासमोर कबूल केलेले आहे की आमच्याकडे प्रकल्प उभारणीसाठी जमिन/क्षेत्र नाही आणि जमीन मिळाली नाही, तर आम्ही प्रकल्प उभारणी करणार नाही. तर अशा प्रकारचा प्रकल्प होण्याची शक्यता नाही. मात्र जर प्रकल्प प्रवर्तक यांनी अशा प्रकारचा प्रकल्प उभारणी करण्यासाठी ही जागा सोडून दुसरी जागा जरी घेतली, तरीही त्या गावातील ग्रामस्थांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना प्रकल्प विकसित करता येणार नाही. इतरांना ज्यादा मोबदला दिला, तरीही असा प्रकल्प कसा होत नाही, याची आपण आता चर्चा करणार आहोत.

**मुद्दा क्रं-१ -**

जर एखाद्या व्यक्तीने ठरविले की माझ्या जमिनीला चांगला भाव मिळणार आहे, म्हणून मी जमिन प्रकल्प प्रवर्तकांना विकतो, तर ते करता येणार नाही कारण शेजारी असलेल्या ३+७+३९ अशा ४९ गावांचा प्रश्न आहे. तर फक्त एकाच्या जमिनीचा प्रश्न नाही, तर बाकीच्यांचे काय हा मुद्दा उपस्थित होतो म्हणून मी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस सांगू इच्छितो की बैठकीचा वस्तूनिष्ठ अहवाल तयार करुन तो शासनास सादर करण्यात यावा. आम्हांला विकास पाहिजे. विकास होत असताना कारखानासुध्दा पाहिजेत मात्र मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कशा प्रकारचा विकास हवा, तर ज्याठिकाणी कमीतकमी निसर्गाचा -हास होईल, निसर्गाला कमीतकमी त्रास होईल- त्याला recreation of environment म्हणतात, असा प्रकल्प असावा. म्हणजे मराठीमध्ये म्हणतात **"पर्यावरणपुरक प्रकल्प" (Environment Friendly)** असा असावा. माझे म्हणणे असे आहे आणि अगोदरच्या उपस्थितांनी सांगितलेल्या विचारांनुसार सर्व ग्रामस्थांनी सांगितलेले आहे की प्रकल्पाला ग्रामस्थांचा विरोध नाही विकासाला विरोध नाही. त्यांचा

विरोध आहे प्रकल्पाच्या स्थान निश्चिततेला. त्यांनी सांगितले की एम.आय.डी.सी. श्रीगोंदा तालुक्यात आहे आणि तेथे जागाही उपलब्ध आहेत. एमआयडीसी क्षेत्र महाराष्ट्र शासनाचे अधिसूचित (Notified) औद्योगिक क्षेत्र असते आणि तेथे विविध प्रकल्प स्थापन करण्यासाठी सर्व पायाभूत सुविधा आणि सेवा उपलब्ध केलेल्या असतात. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचित औद्योगिक क्षेत्रात प्रकल्प उभारणी करावी. आमच्या स्थानिक शेतक-यांच्या बागायती क्षेत्रातील जमिनी घेऊ नयेत. आपण पुण्याहून मुंबईला जात असताना आपल्या नजरेत येते की ए.सी.सी. कंपनीचा प्रकल्प हा पनवेलजवळील एमआयडीसीमध्येच कार्यरत आहे असे प्रकल्प अधिसूचित (Notified) औद्योगिक क्षेत्रातच उभारणे योग्य असते. म्हणजे आमची पहिली हरकत आहे स्थान निश्चिततेला. स्थान निश्चित करताना दोन किलोमीटर अंतरावर तीन गावे आहेत, पाच किलोमीटर अंतरावर सात गावे आहेत आणि दहा किलोमीटर अंतरावर ३९ गावे आहेत. म्हणजे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील ४९ गावांना या प्रकल्पामुळे त्रास होणार आहेत. कंपनीने या ४९

Shinde

गावांवर काय परिणाम होईल याचा अभ्यासच केलेला नाही. आता कंपनीचा ईआयए अहवाल पाहिला असता त्यात कंपनीने लिहिले आहे की आम्ही जी माहिती संकलित केलेली आहे, त्याचा कालावधी ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ असा आहे. पान नं. १९ व २१ वर म्हटलेले आहे की टीओआर दिनांक १९-१२-२०२४ ला मंजूर झालेला आहे. मग जर टीओआर दिनांक १९-१२-२०२४ ला मंजूर झालेला आहे, तर माहिती गोळा करण्यास अगोदरच सुरवात केलेली आहे का? इंग्रजीमध्ये त्यास Putting Cart before the Horse असे म्हणतात. जेव्हा टीओआर मंजूर होतो, त्यानंतरच सर्वेक्षण, डेटा गोळा करण्यास सुरवात होत असते. ईआयए अहवाल पाहिल्यास त्यात असे लिहिलेले आहे की टीओआर मंजूरीनंतर परिसराचे सर्वेक्षण करुन ईआयए अहवाल तयार करण्यात आलेला आहे. जर टीओआर १९-१२-२०२४ ला मंजूर झाला, याचा अर्थ सर्वेक्षण अगोदरच करण्यात आले आहे का? आता पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना स्थानिक गावातील फोटो काढले, मात्र ग्रामस्थांचे म्हणणे आहे की ईआयए अहवालातील फोटो हे त्या गावाचेच नाहीतच. जर

Shinde

त्यांच्या गावातीलच फोटो नसतील, तर असे चोरीचुपी का करण्यात आले? गावक-यांच्या साक्षीने, सोबत, सहभागाने फोटो घेणे हे योग्य होते. ते न केल्याने त्यात पारदर्शकता राहिलेली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. याकारणांमुळे सुध्दा हा प्रकल्प रदद होण्यास पात्र आहे. जर कंपनीने ग्रामस्थांना विश्वासात घेतले नसेल, तर या अहवालाचे पान नं. ६६५ पाहण्यात यावे. येथे दिसून येते की हा प्रस्तावित प्रकल्प दोन मुख्या नदीच्या खो-यात आहे - भीमा नदी आणि घोड नदी. जर हा प्रकल्प दोन नद्यांच्यामध्ये असेल, तर प्रस्तावित प्रकल्पातून भविष्यात होणा-या जल व हवा प्रदूषणाचा विचार या अहवालात करण्यात आलेला नाही. जर प्रकल्प झाला व प्रदूषण झाले, तर आषाढी, कार्तिकी वारीला जाणा-या वारक-यांना आपण प्रदूषित पाणी पिण्यास देणार आहोत काय? या प्रकल्पाचा अभ्यासच झालेला नाही. तसेच प्रकल्प क्षेत्राचे फोटो पाहिल्यास हे लक्षात येईल की सर्वच क्षेत्र हे समृध्द फ्लोरा आणि फाऊना आहे. येथे भाजीपाला, फळे व फुले यांचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेण्यात येते. या काळ्याभोर, मुबलक

Shinde

पाणी असलेल्या क्षेत्रात सिमेंट प्रकल्प करायचा आहे का? जर येथे सिमेंट प्रकल्पाची उभारणी केली, तर जल, हवा प्रदूषणाबरोबर पाण्याचे स्त्रोत, भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत हे सर्व प्रदूषित होणार आहे. प्रस्तावित प्रकल्प सिमेंट उत्पादनासाठी पाच लाख लिटर प्रति दिन पाणी लागणार आहे. आपल्याला माहित आहे की महाराष्ट्रातील अनेक गावात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. आणि आपल्या शेतक-यांच्या शेतीसाठी लागणारे कोट्यावधी लिटर पाणी हे या सिमेंट प्रकल्पासाठी वापरावे लागणार आहे. **<u>हवेचे प्रदूषणः-</u>** अहवालात पान नं. १३१ वर लिहिलेले आहे उत्पादनासाठी Dry Fly Ash and Pond Ash वापरली जाणार आहे. ६,०००.० मे. टन वापरली जाणार आहे. म्हणजे हे हवा प्रदूषण पुर्ण ४९ गावांना त्रास देणार आहे. त्याचा शास्त्रीय अभ्यास झालेला नाही. प्रकल्पाच्या आसपास शेती, फळबागा, पीके, केळीच्या बागा आहेत. त्या सिमेंट प्रकल्पामुळे नष्ट होऊन जातील. येथे पिढ्यानपिढ्या राहिलेला शेतकरी या प्रकल्पामुळे विस्थापित होणार आहे. म्हणजे काही शेतक-यांच्या जमिनी अधिग्रहित करुन इतरांच्या जमिन अधिग्रहित न करता, त्यांच्या जमिनी विकत न

घेता त्यांच्या जमिनीची उत्पादन क्षमता (Productivity) कमी करणार आहोत का? तरी अहवालात याची स्पष्ट नोंद होणे आवश्यक आहे.

राज्य राखीव पोलिस दलाचे महाराष्ट्रातील सर्वात मोठे प्रशिक्षण केंद्र काही किलोमीटर अंतरावरच आहे. १२०० एकरात वसलेले हे प्रशिक्षण केंद्र आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची काळजी घेणारे आपले जवान पोलिस आणि त्यांचे कुटुंबिय राहत आहेत. जर तेथील हवा प्रदूषित झाली, तर आपल्या पोलिस जवान व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्यावर परिणाम होईल. हा मुद्दा अहवालात लक्षात घेतलेला नाही. अशा नविन प्रकल्प स्थापित करताना प्रथम काय केले जाते, तर प्रकल्प स्थानाची टोपोग्राफिकल (भौगोलिक) स्थिती आणि आंतरराष्ट्रीय शोध निबंध यांचा विचार करण्यात येतो येथे ते घेण्यात आलेले नाही. या प्रकल्पाच्या ईआयए अहवालात कुठल्याही प्रकारच्या रिसर्च पेपरचा उल्लेख नाही. तसेच या प्रकल्पात उत्पादन प्रक्रियेसाठी कोळसा वापरला जाणार आहे. कोळसा वापरल्याने सल्फर-डाय-ऑक्साईडची निर्मिती होणार आहे. $SO_2$ या विषारी वायूमुळे परिसरातील लोकांना त्रास होणार आहे.

परिसरातील लहान मुले, तरुण-तरुणी तसेच वयस्कर माणसांना याचा त्रास होणारच आहे. दम्याच्या रुग्णांना विशेष त्रास होणार आहे. या अहवालाचे फाऊन्डेशनच चुकलेले आहे. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी एमआयडीसी कार्यालयात जाऊन प्रकल्पासाठी जागा घ्यावी. तेथे त्यांना प्रकल्प स्थापनेसाठी मदत, पाठिंबाच मिळेल.

आज आपल्याकडे ग्रीन कव्हरेजबाबत बरेच बोलले जाते. मा. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया आणि भारत सरकार यांनी याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे. या प्रकल्पाचा परिसरातील वनांवर, जंगली प्राण्यांवर काय परिणाम होईल हा मुद्दा ईआयए अहवालात दुर्लक्षित करण्यात आलेला आहे. अहवालात लिहिलेले आहे की सर्वेक्षण करताना आम्ही जंगली प्राण्यांबाबत चौकशी केलेली आहे. याच ठिकाणी Wild Life Act, 1972 च्या नुसार येथे जंगली प्राणी पाहण्यात आलेले आहेत. वर्तमानपत्रात त्याची नोंद आहे, मात्र ईआयए अहवालात जंगली प्राणी नसल्याची नोंद आहे. म्हणजे ईआयए अहवाल तयार करताना पर्यावरण सल्लागार यांनी जंगली प्राण्यांचे वर्गीकरण करताना अभ्यास केलेला दिसत नाही. तसेच प्रकल्प

उभारणी ही कोणत्या गट नंबर, सर्व्हे नंबरवर करणार आहेत, त्याची संपुर्ण माहिती उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यासाठी फक्त Land Identified आहे असे नुसते म्हणता येणार नाही. म्हणजे आम्ही गावात करु, तालुक्यात करु असे म्हणता येणार नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी सिमेंटचे उत्पादन केल्यानंतर त्या छोट्या गावात मोठ मोठे वाहन येणार. जरी प्रकल्प प्रवर्तकांनी वाहतुक व्यवस्थापन आराखडा तयार केला, मात्र तो वस्तूनिष्ठ नाही. एका छोट्या गावात हा मोठा प्रकल्प छोट्या गावात होणार, प्रकल्प उभारणीसाठी व नंतरही येथे मोठे वाहन, टिपर्स येणार. लहान गावात मोठ्या वाहनांमुळे जी वाहतुक कोंडी होईल, याबाबत अभ्यास केलेला आहे, मात्र तो वस्तूनिष्ठ नाही. Prevention is better than Cure. मात्र या प्रकल्पामुळे जल, हवा प्रदूषण होणारच आहे. जरी प्रकल्प प्रवर्तक पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) राबविण्याचे आश्वासन देत असले, तरीही प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे परिसरातील गावे बरबाद होतील. येथे जे वाडवडिलांपासून शेतकरी

राहत आहेत, त्यांच्या पुढील पिढ्या प्रदूषणामुळे बरबाद होतील. याबाबत वस्तूनिष्ठ अभ्यासच झालेला नाही.

दोन प्रकारे अभ्यास होणे गरजेचे आहे. पहिला एमआयडीसीत प्रकल्पाची जागा घेऊन नव्याने अभ्यास करणे, दुसरा - Terms of Reference नुसार जरी तांत्रिक अभ्यास योग्य प्रकारे करण्यात आलेला नाही, तरीही तांत्रिकदृष्टया प्रकल्पाचे स्थान (साईट) ही योग्यच नाही. भविष्यात प्रदूषण न होण्यासाठी प्रकल्पाचे स्थान योग्य नाही. या ठिकाणी अनेक लोकांनी अनेक मुद्दे मांडलेले आहेत. त्याचा सारांश मी येथे सांगितलेला आहे.

२६) <u>**श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर व श्री. अजय उर्फ महाराज शिपलकर, राहणार-शिपलकरवाडी, तालुका - श्रीगोंदा,**</u> वरिल स्थानिक दोघा तरुणांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना स्टेजवर बोलावून आमच्या गावातील एकतरी फोटो ईआयए अहवालात आहेत का याबाबत हिंदीमध्ये विचारणा केली.

त्या दोघांनी पर्यावरण सल्लागार यांना आक्षेप नोंदविताना सांगितले की आपण चुकीची माहिती देत आहात, चुकीची माहिती

ऐकण्यास आम्ही आलेलो नाहीत. दोन डायमेन्शनवर एकच फोटो कसा येईल?

**पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्प गावातील फोटो नसल्याचे मान्य केले.**

**२७) श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा,** त्यांनी दोन फोटो दाखविले. त्यांनी दोन्ही फोटो वेगवेगळे स्थानाचे आहेत का याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी दोन्ही फोटो वेगवेगळे स्थानाचे आहेत सांगितले.

त्यावेळी कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी आक्षेप नोंदविला त्या दोन्ही फोटोंचा अक्षांश व रेखांश हे जुळत नाहीत. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी तो एकच फोटो असल्याचे सांगितले. एकाच co-ordinator वर दोन फोटो घेतलेले आहेत. श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी AAQ मशिन तीन मिटर उंचीवर ठेवणे हे गरजेचे आहे व ते ठेवले होते काय याबाबत विचारणा केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की AAQ मशिन हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित निर्देशांनुसारच ठेवण्यात

येते. तसेच यांनी सांगितले की सॅम्पलर हे आपत्कालिन क्षेत्रात (critical area) स्थापित करत असतो.

श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी आक्षेप नोंदविला की ध्वनी प्रदूषण नमुने घेताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित निर्देश पाळण्यात आलेले नाहीत व **प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी ते मान्य केले.**

त्यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांनुसारच सर्वेक्षण, नमुने गोळा करणे बंधनकारक आहे.

**श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी सांगितले की** येथे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देश पाळण्यात आलेले नाहीत. त्यांनी पर्यावरण सल्लागारांशी पाण्याचे, हवेचे, ध्वनीचे नमुने कसे घेतले याबाबत चर्चा केली. या मुद्द्यावर पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही.

**<u>श्री सागर मंत्री, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगरः-</u>**

ईआयए अहवाल हा सात मुदयांवर तयार करावा लागतो. त्यातील तीन नंबरचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे, तो मुद्दा म्हणजे - Anticipated Environmental Impacts and the Mitigations Measures हा मुद्दाच कंपनीने गाळून टाकलेला आहे. हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. कारण हा मुद्दा आपल्या आयुष्याशी आणि आरोग्याशी खेळणार मुद्दा आहे.

**येथे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी संबंधित मुद्दा वगळ्याचे मान्य केलेले आहे.**

त्यावेळी स्टेजवर काही स्थानिक एकत्रित प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांच्याशी चर्चा करत होते, त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवाल हा मराठीत केलेला आहे. तो संक्षिप्त असल्याने तो मुद्दा म्हणजे - Anticipated Environmental Impacts and the Mitigations Measures लिहिलेला नाही. सदरहू मुद्दा ईआयए अहवालात आलेला आहे.

त्यावेळी श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर स्टेजवर पर्यावरण सल्लागार व आयोजक यांच्याशी गटाने चर्चा करत होते. श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी आक्षेप नोंदविला ही महत्वाचा मुद्दा हा कार्यकारी सारांश अहवालातून वगळण्यात आलेला आहे. येथील स्थानीक भाषा मराठी आहे. तर स्थानिकांना त्याबाबत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास त्यांनी काय करावे? आम्ही आक्षेप नोंदवितो की स्थानिकांना कळू नये म्हणूनच हा मुद्दा वगळण्यात आलेला आहे. त्यांनी ईआयए अहवाल मराठीमध्ये तीस दिवस अगोदर स्थानिकांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

त्यास श्री मगर व इतरांनी पाठिंबा दिला.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, अनवधानाने तो मुददा कार्यकारी सारांश अहवालातून वगळण्यात आलेला आहे.

त्यावेळी श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर आणि श्री कौशिक योगेश मगर यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण सल्लागार यांनी स्थानिकांची दिशाभूल करण्यासाठीस ही मुद्दा वगळण्यात आलेला आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही जाणूनबूजून हा मुद्दा वगळलेला नाही.

**<u>श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर</u>** यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की जो ईआयए अहवालातील महत्वाचा मुद्दा, जो या अहवालातील गाभा असतो, तो म्हणजे - Anticipated Environmental Impacts and the Mitigations Measures म्हणजे या प्रकल्पामुळे येथील निसर्गावर जो अपेक्षित पर्यावरणीय परिणाम म्हणजे प्रदूषण होणार आहे, ते कमी करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहेत, हे त्यांनी स्थानिकांना अवगत करणे, वचन देणे हाच जनसुनावणीचा मूळ उद्देश असतो. कंपनीने हाच मुद्दा वगळला आहे. म्हणजे कंपनी स्थानिकांना अंधारात ठेऊन कंपनी स्वतःचा स्वार्थ साधणार आहेत. म्हणजे हा अहवाल बोगस आणि अवैध आहे.

**पर्यावरण सल्लागार यांनी मान्य केलेले आहे की हा मुद्दा कार्यकारी सारांश अहवालात नाही.**

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय हरकती, सूचना किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**<u>२८)श्री अमोल पवार, माजी सरपंच, सोनवडी, तालुका-दौंड,</u>**
प्रस्तावित प्रकल्पाविषयी माझे आक्षेप मी तीस दिवसांपूर्वीच स्थानिक कार्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर येथे लेखी स्वरुपात नोंदविलेले आहेत. प्रस्तावित प्रकल्पात हजारो टन, दगडी कोळश्याचे क्रशिंग होणार आहे. त्याची धूळ उडणार आहे. विषारी वायूचे उत्सर्जन होणार आहे. तसेच भीमा नदीत असणा-या विविध जलचरांवर या प्रकल्पाचा विपरित परिणाम होणार आहे. या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेतीवर विपरित परिणाम होणार आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न घटल्यामुळे शेतक-याचे आर्थिक उत्पन्न कमी होणार आहे. त्यांनी आक्षेप नोंदविला की आम्ही जेथे राहतो, तेथून कुरकुंभ एमआयडीसी जवळच आहे. तेथील विविध प्रकल्पांचा धूर व वास आमच्या गावात पसरतो. ही

कंपनी आमच्या गावापासून फक्त २.५ कि.मी. लांब आहे. त्यामुळे आमच्या गावाला या प्रस्तावित प्रकल्पाचा त्रास होणार आहे. तरी या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

अहवाल फारच अपुर्ण आहे. अहवालात नमुद करण्यात आलेले आहे की प्रकल्पात प्रत्यक्ष रोजगार मिळेल, पण सदरहू प्रकल्पामुळे अप्रत्यक्ष रोजगारात वाढच होणार आहे. येथे प्रत्यक्ष रोजगार व अप्रत्यक्ष रोजगार यात खुलासा करण्यात यावा.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की एखादा प्रकल्प सुरु झाल्यानंतर तेथे कामगारांची, कॅन्टीनची गरज असते. कंपनी त्यांना पगार देते. यास प्रत्यक्ष रोजगार म्हणतात तर प्रकल्पासाठी कंपनीस काही कामे ही कंत्राटदाराव्दारे करावी लागतात. कंत्राटदार काम करताना काही माणसे नेमतो. म्हणजे त्या कामगारांना अप्रत्यक्षपणे कंपनीमुळे काम मिळते, त्यास अप्रत्यक्ष रोजगार म्हणतात.

त्यावेळी काही स्थानिकांनी आम्हांला हा प्रकल्पच नको, तर येथे रोजगाराचा प्रश्नच येत नाही असे एकत्रित घोषणा केली.

२९) <u>**श्री सागर मंत्री, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा,**</u> त्यांनी सांगितले की मी या प्रकल्पाविषयी हरकत घेत आहे. त्यांनी त्यांच्या कुटुंबियांतर्फे हरकत घेतली. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना दोन प्रश्न विचारले, त्याचे उत्तर होकार वा नकार देण्याची सूचना केली. त्यांनी उपस्थितांना सांगितले की आतापर्यंत आपण पर्यावरण सल्लागार यांनी सादर केलेल्या ईआयए अहवालावरच चर्चा केली. तर कार्यकारी सारांशामध्ये जो Survey of India Topographical Condition नकाशा छापलेला आहे - तो आपण छापलेला आहे काय? त्यांनी सांगितले की एखाद्या प्रकल्पाचा दहा किलोमीटर परिघाचा अभ्यास करण्यास पर्यावरण सल्लागार यांना का सांगतात, तर प्रस्तावित प्रकल्पाचा जो संभाव्य परिणाम होणार आहे, तो दहा किलोमीटरपर्यंत असतो. पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणातील पान नं. ४ आणि कार्यकारी सारांश अहवालात सांगितले की Project Site is not located in a "Critically Polluted Area or Cluster." श्री मंत्री यांनी सांगितले की १० कि.मी. परिघात दौंड तालुका, श्रीगोंदा तालुका,

शिरुर तालुका येथे बरेच साखर कारखाने आहेत. तसेच या परिसरात २,५०० पेक्षा जास्त दुधसंकलन केंद्रे आहेत. म्हणजे हा पट्टा हा “Pure Green Zone” आहे. तसेच पशूसंवर्धन विभागानेही (Animal Husbandry Department) हा पट्टा/परिसर सर्व प्रकारच्या पशु आणि पाळीव जनावरांच्या संवर्धनासाठी अत्यंत पोषक असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. आता कार्यकारी सारांश अहवालात पान नं. १ व २ वर प्रस्तावित प्रकल्पामुळे संभाव्य दुष्परिणाम दिलेले आहेत. एकंदरीत १४० मुद्दे आहेत, त्यांनी सांगितले की फक्त १४ मुद्देच येथे घेत आहे. श्रीगोंदा तालुक्यातील ८-१० ग्रामपंचायती, दौंड तालुक्यातील २-३ ग्रामपंचायती एवढीच नांवे त्यांनी अहवालात दिलेली आहेत. १० कि.मी. परिघातील सर्व ग्रामपंचायती, सर्व वाड्या-वस्त्या, सर्व नागरिक, सर्व पाणीपुरवठा स्टेशन्स, सर्व आरोग्य संस्था म्हणजे दवाखाने, सर्व शैक्षणिक संस्था, ही अतिमहत्वाची ठिकाणे हे सर्व प्रस्तावित प्रकल्पाच्या जल, हवा, ध्वनी या सर्व प्रदूषणामुळे बाधित होणार आहेत. त्यामुळे दमा, फुफ्फुसाचे विकार, ह्रदयविकार, आकस्मिक मृत्यू, कॅन्सर, स्कीन कॅन्सर असे दुर्धर आजारांमुळे

ग्रस्त होण्याची संभावना आहे. त्यासाठी त्यांनी प्रकल्प परिसरातील सर्व ग्रामपंचायती, नगरपरिषद यांची नांवे वाचली.

दौंड तालुक्यातील दौंड रेल्वेस्टेशन, दौंड कॉडलिंग जेथून रोज एक ते दीड लाख लोक रोज जाणे-येणे करतात, महाराष्ट्र राज्य राखीव पोलिस दल प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र राज्य राखीव पोलिस दलाची सर्व युनिट्स या सर्वांवर या प्रकल्पाच्या प्रदूषणाचा परिणाम होणार आहे.

आता या प्रकल्पाचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे घोड नदी व भीमा नदीच्या पाण्यावर या प्रकल्पाची धूळ/डस्ट उडणार आहे. त्यामुळे इंदापूर येथील ९८ गावांवर याचा प्रत्यक्ष (direct) परिणाम होणार आहे. तसेच सोलापूर महानगरपालिकेला, पंढरपूरला भीमा नदीचेच पाणी जाते.

मी दिलेल्या अहवालामधील पान नं. ८ वरील भारत सरकारच्या पर्यावरण मंत्र्यांनी लोकसभेत दिलेले उत्तर त्यांनी वाचून दाखविले. श्री. सागर मंत्री यांनी सांगितले लोकसभेत भारत सरकारच्याच पर्यावरण मंत्र्यांनीच कबूल केलेले आहे की सिमेंट कंपन्यांमुळे प्रदूषण

होते. तरी या प्रकल्पास मंजूरी देताना आपल्या जीवाचा विचार करुन परवानगी देण्यात यावी.

श्री मंत्री यांनी सांगितले की सिमेंटमध्ये हेवी मेटल्स असतात. त्यांनी विविध रिचर्स पेपरचा उल्लेख केला आणि सिमेंट प्रकल्पामुळे होणा-या प्रदूषणाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की सर्व प्रक्रिया केल्यानंतर १५००° ते ३०००° नंतर सिमेंट तयार होते. येथे ४०° डिग्री तापमाणावर लोक काम करायला लागले की आजारी पडतात, तर येथे सिमेंट कंपनीमुळे एवढ्या उष्णतेमुळे लोकांना किती त्रास होईल.

आज भुसावळला उष्णता वाढल्यामुळे लोकांना दुस-या ठिकाणी हलविण्यात येत आहे. तर येथे काय होईल? अतिउष्णतेमुळे गर्भपात होतो असेही वैदकीय अहवाल आहेत.

माझ्या अहवालातील पान क्रमांक २७ प्रकल्पातून येणाऱ्या विविध विषारी वायूंमुळे येथील ओझोन थर पूर्णपणे नष्ट होईल. त्यामुळे, जास्त प्रमाणात विरघळल्याने कर्करोग होतो. तसेच राजस्थानमधील ३५ कि.मी. परिसरातील शेती ही एकाएकी खराब झाली. तरी या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये ही विनंती.

श्री मंत्री यांनी सांगितले की जागतीक आरोग्य संघटना (WHO) यांनासुध्दा मान्य केलेले आहे की या सिमेंट प्रकल्पातून जे प्रदूषके निर्माण होतात, त्यामुळे प्रकल्प क्षेत्रातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. आता येथे ४० ग्रामपंचायती आहेत. एक ग्रामपंचायत दोन हजार लोकांसाठी आहे. दौंड नगरपरिषद दोन लाख लोकांची आहे. म्हणजे कमीतकमी तीन लाख लोकांना त्रास होणार आहे.

माझ्या अहवालमधील पान नं. ४०,४१,४२,४३ - मध्ये नमूद केलेले आहे की जे काही श्वसनाचे जीवघेणे आजार होतात, ते या सिमेंट कंपनीमुळे होतात. तसेच जनावरांनाही श्वसनाच्या जीवघेणे आजार होतात. तसेच शेती जमिनीवरही परिणाम होतो. शेत जमिनीचा कस कमी होतो.

श्री. मंत्री यांनी सांगितले सदरहू प्रकल्प आपल्या परिसरात प्रदूषण करेल म्हणून परवाना न देण्याची मागणी केली. तर शासनाने/महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जे सिमेंट प्रकल्प बंद केले, त्याची यादी वाचून दाखविली. त्यांनी सांगितले की जळगावच्या

अल्ट्रा-टेकच्या प्रकल्पास शेतक-यांचा विरोध व शेतीच्या क्षेत्रात प्रकल्प उभा राहणार होता म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी नाकारलेली आहे. श्री. मंत्री यानी इतरही बंद करण्यात/परवाना नाकारलेले सिमेंट प्रकल्पाची यादी वाचली. **(त्यांनी दिलेल्या अहवालांच्या प्रति जोडलेल्या आहेत)**

**३०) श्री. राकेश कैलास पाचपुते, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा.**

अकरा ग्रामपंचायतींना प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल उपलब्ध करण्यात आलेला होता. प्राप्त ईआयए अहवालाच्या अनुषंगाने ग्रामसभा घेण्याची सूचना करण्यात आलेली होती. त्यानुसार काष्टी ग्रामपंचायत, तालुका-श्रीगोंदा यांनी ग्रामसभा बोलाविली. संपूर्ण अहवालाचे वाचन झाले. वाचन झाल्यानंतर सर्व ग्रामस्थांनी एकमताने या कंपनीस विरोध केलेला असून तसा ठराव मंजूर केलेला आहे. सदरहू ठरावाची प्रत ग्रामसेवक व सरपंच यांच्या स्वाक्षरीने पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीस सादर करण्यात आलेला आहे. आता त्याचबरोबर माझी वैयक्तिक हरकतसुध्दा सादर करण्यात आलेली

आहे. माझी पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीस विनंती आहे की एकच मुद्दा किंवा वेगवेगळे मुद्दे वेगवेगळ्या पध्दतीने बैठकीत सांगत आहेत. सिमेंट उद्योगाचे तोटे हे आमच्यापेक्षा तुम्हांला जास्त माहित आहेत. तरी सर्वांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या हरकती, आक्षेप यांची विचार करुन प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देऊ नये अशी मी सर्वांतर्फे आपणास विनंती करत आहे. तसेच प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात अनेक गावे आहेत की त्यांच्यापर्यंत प्रस्तावित प्रकल्पाचा ईआयए, कार्यकारी सारांश अहवाल आजपावेतो पोहचलेलाच नाही. ते येथे उपस्थितसुध्दा नाहीत. श्री राकेश कैलास पाचपुते यांनी सांगितले की बैठकीत अनेकांनी आक्षेप घेतला की प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात खोटी माहिती दिलेली आहे. तरी या प्रकल्पास परवानगी देऊ नये अशी मी माझ्या गावातर्फे विनंती करत आहे.

**३१) <u>श्री. गणपत नामदेव परकाळे, राहणार-कौठा, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर, अध्यक्ष, श्रीराम मंदिर कौठा ट्रस्टः-</u>**

आमचा श्रीराम मंदिर कौठा ट्रस्ट आहे. त्या ट्रस्टच्या माध्यामातून मी येथे उभा आहे. पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीने सकाळपासून शेतक-यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत मांडलेली व्यथा ऐकलेल्या आहेत, त्याबद्दल धन्यवाद. भीमा आणि घोड नदीच्या खो-यातील आमचे हे शेतीचे क्षेत्र आहे. आमचे येथील वातावरण, पाणी हे प्रदूषणाचा विचार करता खूपच चांगले आहे. प्रस्तावित सिमेंट प्रकल्पामुळे हा सुजलाम-सुफलाम शेतीचे क्षेत्र हे उजाड होईल, म्हणून आमचा प्रकल्पास विरोध आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केलेल्या ईआयए अहवालातून दोन मुद्दे उपस्थित झालेले आहेत. ते म्हणजे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेले सर्वेक्षण हे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेतील पारित निर्देशांप्रमाणे झालेले नाही. तर मुद्दा उपस्थित होतो की त्यांनी परत सर्वेक्षण करावे का? तर त्यांना दुस-या जागी जाण्याचे बैठकीत सूचना करण्यात आलेली आहे, ते झाले तर येथील स्थानिक शेतक-यांवर आलेले मानसिक दडपण नाहिसे होईल.

**<u>माझे प्रश्न खालील प्रमाणे आहेत -</u>**

प्रस्तावित प्रकल्प उभारणी ही दोन टप्प्यात होणार आहे. तर आमच्या क्षेत्रात ५६० कोटींचे ऊस उत्पादन होते. तसेच ५०० कोटींपर्यंत इतर पिकांचे उत्पादन होते, त्यात कांदा, कपाशी, भूईमूग वगैरे इतर पिके घेतली जातात. आमचा समृध्द व्यवसाय आहे. म्हणजे एका बाजूस डालमियाची ९०० कोटींची कंपनी आणि दुस-या बाजूस कष्ट करुन दरवर्षी सुमारे १,००० कोटी पेक्षा जास्त व्यवसाय करणारे शेतकरी. सिमेंट प्रकल्प येथे न परवडणारा आहे. जगाचा पोशिंदा असणारा हा शेतकरी सिमेंट कंपनीमुळे देशोधडीस लावण्याचा डाव आम्ही होऊ देणार नाही. सिमेंट प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे येथील हवा प्रदूषण होऊन शेतीच्या उत्पादनावर परिणाम होईल. तसेच या सिमेंट प्रकल्प उभारणीसाठी FBIAA ची पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नाही. FBIAA ची परवानगी घेऊन प्रकल्पाची प्राथमिक पडताळणी करणे आवश्यक होते. ती करण्यात आलेली नाही. कंपनीने प्रथम स्थानिक शेतक-यांशी, येथील समाजसेवकांशी चर्चा केली असती, तरीही प्रकल्पाबाबत सर्वेक्षण झाले नसते. समजा प्रकल्प उभारणी झाली, तर येथील क्षेत्रापैकी फक्त ८६% चा वापर होईल. मात्र नाही

झाली तर शेतीसाठी येथील क्षेत्राचा ९९.१४% वापर होईल. प्रस्तावित प्रकल्पात प्रत्येक उत्पादन होताना त्यावेळेस कोणती प्रदूषके उत्पन्न होतील, याचा ईआयए अहवालात उल्लेख नाही. तसेच उत्पन्न होणा-या राखेमुळे परिसरातील पिकांवर, वनस्पतीवर निश्चितच परिणाम होणार आहे. वनस्पतींवर येणारे टोळ, पाखरे नष्ट होतील. त्यामुळे सर्व नैसर्गिक अन्नसाखळी धोक्यात येईल. कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरात श्वसनाचे आणि इतर गंभीर आजार बळावतील. कंपनीने विविध प्रदूषकांची (Pollutants) केलेली गणना (calculation) यामध्ये तफावत आढळते. कंपनीमुळे प्रदूषण वाढले, तर आम्लयुक्त पाऊस पडतो. कंपनीने ईआयए अहवालात प्रकल्प फायद्याचा आहे असे सांगितले. तर प्रकल्प स्थापनेमुळे ३०,६२७.७८ हेक्टर क्षेत्राचे नुकसान होण्याची भिती आहे. ही कंपनी रोज भीमा नदीतील पाच लाख लिटर पाणी वापरणार आहे. त्यामुळे शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्यावर परिणाम होईल. त्यामुळे कंपनीला भीमा नदीतील पाण्याचा उपसा घेण्यास परवानगी देऊ नये. या प्रकल्पामुळे बेनामी व्यवहार (transactions) होणार आहेत. कारण प्रकल्प प्रवर्तकांना जमिन विकत

घेता येणारच नाही. यात प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व कर, जीएसटी बुडविलेला आहे. या कंपनीने चोरी करुन करोडो रुपयांचा टॅक्स चुकविलेला आहे. कंपनीचे नियोजन हे टॅक्स बुडविण्याचे नियोजन आहे. शासनाची स्टॅंप ड्युटी चोरलेली आहे. त्यांनी कंपनीने शेतक-यांबरोबर केलेला एमओयु वाचून दाखविला. त्यांनी विश्वास व्यक्त केला की हा प्रकल्प रद्द होणार आहे.

३२) **<u>प्राध्यापक सुनील माने, राहणार-काष्टी, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर, सचिव, बागायत शेती, आरोग्य व पर्यावरण बचाव कृती समिती, घोड-भीमा नदी पट्टाः-</u>** डालमिया भारत ग्रीन व्हिजन लिमिटेड यांच्या प्रस्तावित सिमेंट प्रकल्प निमगाव खलू, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर येथे उभारणीस मी हरकत मी नोंदवत आहे. येथे उपस्थितांनी अतिशय अभ्यासपूर्वक मुद्दे मांडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्प व्यवस्थापन, प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देता आले नाही. प्रस्तावित प्रकल्पासाठी जी जागा लागणार आहे, तीच या प्रकल्पासाठी उपलब्ध नाही. यावर सर्व स्थानिकांनी हरकती घेतलेल्या आहेत. प्रस्तावित

प्रकल्पास माझी हरकत आहे की प्रस्तावित प्रकल्पास लागणारी जागा ही घोड नदी व भीमा नदी या दोन्ही नदीच्या खो-यात साधारणपणे १-२ कि.मी. परिघात आहे. या दोन नद्यांच्या भागात अत्यंत दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात. त्यात "राखी बंगला" नावाचा दुर्मिळ पक्षी आहे, त्याची वसाहत तेथील मोठमोठ्या झाडांवर आढळते. चित्रपला त्याला आपण Pentox Horn म्हणतो, याचीसुध्दा येते वसाहत आहे. त्याचबरोबर शेताड्या, पाणकावळा असे विविध दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात. तसेच विशिष्ट हंगामात स्थलांतरित होणा-या विविध परदेशी पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात, त्यात फ्लेमिंगोचाही समावेश आहे. त्याचा पुरावा पक्षीमित्र व अभ्यासक पत्रकार श्री. मिलिंद देसाई यांच्या पुस्तकात प्रसिध्द झालेला आहे. प्रस्तावित प्रकल्पातून उत्सर्जन होणा-या विषारी वायू म्हणजे सल्फर-डाय-ऑक्साईड, कार्बन-डाय-ऑक्साईड अशा विविध विषारी वायूंचे उत्सर्जन होईल, त्यामुळे नदीवरील विविध जलचरांवर निश्चितच परिणाम होणार आहे. तेथे मिळणा-या खेकडा, कटला या विविध माशांच्या प्रजातीवर परिणाम होणार आहे. त्यामुळे मासेमारी करणा-

या समाजाच्या उदरनिर्वाहावर सुध्दा परिणाम होणार असल्याने येथील परिसरात आर्थिक-सामाजिक परिणाम होणार आहे. तसेच नदीकिनारी विविध औषधी वनस्पती आढळतात. त्यात कोरफड, बेहडा इ. विविध वनस्पतींच्या प्रजाती आहेत. या वनस्पती प्रस्तावित प्रकल्पातील प्रदूषणामुळे नामशेष होण्याचा धोका संभवतो. तसेच जल, हवा प्रदूषणामुळे नासलेल्या वनस्पतींची टक्केवारीचे प्रमाण वाढणार आहे. येथे माझ्या अगोदरच्या उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे होणा-या स्थानिकांच्या संभाव्य श्वसनासारख्या गंभीर आजारांबाबत सविस्तर आक्षेप नोंदविलेलेच आहेत. मनुष्य प्राण्यांप्रमाणेच पशुपक्षी, जैव विविधतेवरही परिणाम होणार आहे. आम्ही विकासाच्या विरुध्द नाही. शासनाचेही औद्योगिकरणाचे धोरण आहे. मात्र आपल्या महाराष्ट्र राज्यात तसेच इतर राज्यांतही सिमेंट प्रकल्पास झालेला विरोध आपण मिडियामध्ये पाहतो. जेथे प्रकल्प सुरु झाले, त्या विविध राज्यातील जनता वेळोवेळी सिमेंट कंपन्यांच्या प्रदूषणाविरुध्द रस्त्यावर आंदोलन करताना पाहत असतो. येथे समजा ही सिमेंट प्रकल्प सुरु झाल्यास, स्थानिकांना

या प्रदूषणाच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. या परिसरातील पाण्याची उपलब्धतता असल्याने मोठ्या प्रमाणात दूध उत्पादन, विविध भाजीपाला, फळबाग, फुलबाग हंगामानुसार येथे पिकविण्यात येतात. अशाप्रकारे शेतीपुरक असे प्रकल्प येथे उभारण्यात यावेत. स्थानिक जनता अशा प्रकल्पांना निश्चतच पाठिंबा देतील. त्यामुळे येथील तरुण-तरुणींना रोजगार मिळेल, येथील निसर्गावरही कुठलाही दुष्परिणाम होणार नाही. तरी स्थानिकांतर्फे या प्रस्तावित सिमेंट प्रकल्पाचा विरोध करत आहोत.

३३) **<u>श्री. योगेश मानसिंग भोईटे, राहणार-सांगवी दुमाला, तालुका-श्रीगोंदा,</u>** माझ्या तीन हरकती आहेत, कारण येथील, उपस्थितांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तेच तेच मुद्दे मी परत सांगणार नाही.

अ) शेतीला लागून जोड व्यवसाय म्हणजे मधुपक्षीपालन व्यवसाय, रेशीम शेतीव्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, खेकडापालन या व्यवसायांवर प्रस्तावित सिमेंट प्रकल्पाने दुष्परिणाम होणार आहे. माझ्या अगोदरच्या अनेक उपस्थितांनी

प्रस्तावित प्रकल्पाच्या विरुध्द विविध पुरावे देऊन आक्षेप नोंदविलेले आहेत. या परिसरात सिमेंट प्रकल्प स्थापन करणे पूर्णपणे अव्यहार्य आहे.

ब) मी महत्वाचा पुरावा आपल्या वनविभागाने पर्यावरण विभागास दिलेला पुरावा येथे सांगत आहे. ईआयए अहवालाच्या पान नं. २१२ वर तो दिलेला आहे. तो असा - श्रीगोंदा तालुक्यात पाण्यात दुर्भिक्ष आहे, तो दुष्काळग्रस्त आहे. तर माझे म्हणणे आहे की भीमा आणि घोडनदीचा संगम या ठिकाणी होतो. भीमा नदी बारामहिने वाहणारी नदी आहे. मात्र डालमियासारखी खोटारडी कंपनी आमचे गाव हे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करत आहे. तर जिल्हयाची परिस्थिती काय आहे माहिती नाही, पण आम्ही आमच्या गावाचा विचार करतो. येथे मी सर्कल कार्यालय-महसूलचा अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालात आहे की येथे फक्त ५५ दिवसच पाऊस पडत नाही, तर १६ मि.ली. पाऊस पडतो.

क) दुसरा पुरावा - माहिती अधिकार, २००५ अंतर्गत प्राप्त झालेली माहिती- उपवन संरक्षक, अहिल्यानगर यांच्यामार्फत सहायक

वनसंरक्षक, वनीकरण यांना १२-०२-२०२५ रोजी सादर करण्यात आलेला अहवाल. कंपनीने ज्यावेळी परिसराचे सर्वेक्षण केले, त्यावेळी कंपनीस कोणताही वन्यजीव आढळून आलेला नाही.

मात्र येथे बरीच वने असून येथे मुंगुस, खारी, साप, मोर असुन मला आजच **रानगवा** दिसला आणि मी त्वरित वनविभागास सूचना केलेली आहे. मात्र कंपनी आणि त्यांनी नियुक्त केलेले पर्यावरण सल्लागार हे शासनाची दिशाभूल करत आहेत. तरी मी सर्व ग्रामस्थांच्या वतीने या प्रस्तावित सिमेंट प्रकल्पास विरोध करत आहे. त्यांनी व उपस्थित नागरिकांनी **"दालमिया गो बॅक"** च्या घोषणा दिल्या.

**३४)** **<u>श्री. विनायक पांडुरंग मगर, राहणार-गार गाव, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर</u>** यांनी येथे सांगितले की मी स्वतः १३८ पानी माझ्या हरकती येथील स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर कार्यालयात सादर केलेली आहेत. तरीही त्यात काही मुद्दे राहिलेले आहेत, ते आता सादर करत आहे. त्यांनी सांगितले की कंपनी म्हणते की हा दुष्काळी भाग आहे. तर जिल्हा

Shinde

बँकेने सोसायटीला जे कर्ज दिलेले आहे, ते आकडे पाहिल्यास अवाच्च व्हावे लागेल. त्यांनी सर्व सोसायट्या व कर्जाची रक्कम वाचून दाखविली. हे सर्व कर्ज ऊसापोटी आणि पशूधनासाठी दिलेले आहे. येथील स्थानिक शेतक-यांनी आपली जमिन कंपनीस दिलेली नाही. तरी देखील कंपनीने आमचे शेतीचे गट नंबर पूर्वपरवानगीने प्रकल्प क्षेत्रात टाकलेले आहेत. आमच्या शेतीवर आम्हांला ऊस उत्पादनासाठी कित्येक कोटींचे कर्ज मिळते व आम्ही ते परत करतो. मी ज्या गावात राहतो, त्याचे नांव गार आहे. तेथे मोर, भिबट असे अनेक वन्यजीव प्राणी आढळतात. आमच्या पूर्वजांच्यावेळी त्या वनांना कधीही आग लागली नाही. पण आता आमच्या जवळील वनांना आग लागते. वने जळून गेलेली होती. मी त्याबाबत तक्रार केलेली आहे. आपण वनात येऊन आवाज द्या मोर, सायर पक्षी येतील. हे वन प्रस्तावित प्रकल्पापासून एक कि.मी. अंतरावर आहे. तर फक्त मनुष्यासच जीव आहे का, पशूपक्षींना जीव नाही का? आमचे गांव सुजलाम, सुफलाम गाव आहे. मी माझ्या हरकती लेखीस्वरुपात सादर केलेल्या आहेत. मग पर्यावरण विषयक जाहिर

जनसुनावणीस गेले ४-५ तास बसलेल्या स्थानिकांच्या चेह-यांवर हरकती दिसत नाहीत का? मी जर जिल्हाधिकारी कार्यालयात केमिकल कंपनी सुरु करावयाची असल्यास मला परवानगी मिळेल का? शासनाने आमच्या येथील स्थानिकांचा वेळ वाया घालविलेला आहे. ही जनसुनावणीच आयोजित करण्याची आवश्यकता नव्हती. भूमी अधिग्रहणाशिवाय कंपनी कशी उभी राहणार आहे? येथे भूजलपातळी चागंली आहे. हे हरित पट्टा क्षेत्र आहे.

३५) <u>ॲड. आव्हाडः-</u> आता फारसे ताणून न धरता ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी.

३६) **<u>श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा, -</u>** माझे ईआयए अहवालाबाबत काही प्रश्न आहेत. ते मी प्रकल्पाचे सल्लागार यांना विचारत आहे. तुम्ही ईआयए अहवालात लिहिल्यानुसार सॅम्पलर हे तीन मीटर उंचीवर ठेवावे लागते. ते ठेवले आहे का? यावर पर्यावरण सल्लागार यांनी होकार देत सांगितले की तसेच सॅम्पलर ठेवण्यात आलेले होते. तसेच सॅम्पलर

Shinde

५० ते १०० मीटर लांब अंतरावर ठेवण्यात आलेले होते. पर्यावरण सल्लागार यांनी त्यास होकार दिला.

श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी विचारणा केली फोटोवरुन सॅम्पलर हे तीन मीटर उंचीवर दिसत आहे काय?

त्यावेळी पर्यावरण सल्लागार व ते एकत्रिपणे फोटो स्टेजवर तपासत होते. श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी मत मांडले ही सॅम्पलिंग करताना सर्व इंडियन स्टँडर्स मेथड्स हे पाळले पाहिजेत हा नियम आहे. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मान्यता असलेला सॅम्पलरच वापरण्यात आलेला आहे.

श्री. कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी विचारणा केली की, हवा प्रदूषण सर्वेक्षणाच्यावेळी हॉस्पिटलचे सर्वेक्षण का करण्यात आले नाही. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की Most Critical Area मध्येच सॅम्पलरच लावण्यात येतात. त्यांनी सांगितले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पारित निर्देशांनुसार सर्व sampling spots हे खालील बाजूस (downside) लावण्यात आलेले आहे.

यावेळी श्री. अजय उर्फ महाराज शिपलकर, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा, यांनी मत मांडले की हा ईआयए अहवाल एकदम खोटा आहे. हेवेची गुणवत्ता जेथे तपासण्यात आली आहे त्याचे स्थान पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवालामध्ये असलेल्या फोटोमध्ये चुकीचे आहे. तसेच त्या परिसरात एकही सिमेंटचा रोड नाही.

**३७) मा. आ. श्री राहूल कुंडलिक जगताप रा. पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा** - म्हणाले की, ही जनसुनावणी ही स्थानिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आहे. तरी सर्वांनी सहकार्य करावे. कोणालाही बोलण्याबाबत थांबवायचे नाही. **तसेच लोकांना थोडक्यात घ्या हे सांगायच नाही.** जेवढा वेळ बोलावयाचे आहे, तेवढ्या वेळपर्यत बोलून द्यावे.

**३८) श्री. अजय उर्फ महाराज शिपलकर,राहणार-शिपलकरवाडी, ता. श्रीगोंदा,** यांनी बैठकीत स्टेजवरुन सांगितले की या परिसरात ३ कि.मी. पर्यंत सिमेंट रस्ता नाही. मात्र यांच्या अहवालात सिमेंट रस्ता दाखविण्यात आलेला आहे. त्यावेळी पर्यावरण सल्लागार

यांनी सांगितले की आपले जे काही आक्षेप, सूचना असतील, त्या उपस्थित करण्यात याव्यात. आम्हांला पर्यावरण मंत्रालयातही स्पष्टीकरणासाठी जावे लागणार आहे.

३९) <u>**श्री अजय उर्फ महाराज शिपलकर, राहणार-शिपलकरवाडी, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर**</u> यांनी माहिती दिली की हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी एक कोटी रुपये कंपनीने खर्च केलेला आहे. खोटा अहवाल आहे, रेकॉर्ड चुकीचे आहे. खोट्या अहवालावर जनसुनावणी आयोजित करण्यास आलेली आहे.

४०) <u>**श्री कौशिक योगेश मगर, रा. गार, ता. श्रीगोंदा,**</u> ते स्वतः म्हणतात आहे की हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल चुकीचा आहे. त्यांनी स्वतः ईआयए अहवालातील त्रुटी मान्य केलेल्या आहेत. त्यांनी हा अहवाल चुकीचा आहे याची नोंद इतिवृतात घेण्याची विनंती केली.

**श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर** यांनी सांगितले की या परिसरात ३ कि.मी. पर्यंत सिमेंट रस्ता नाही. मात्र कंपनीच्या ईआयए अहवालात

सिमेंट रस्ता दाखविण्यात आलेला आहे. याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर द्यावे.

**४१) मा. आ. श्री राहूल कुंडलिक जगताप रा. पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा,** यांनी मत मांडले की कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकन हा ६०० पानांचा अहवाल उपलब्ध केलेला आहे. मात्र तो स्थानीकांच्या मराठी भाषेत उपलब्ध केलेला नाही. ज्यांनी अहवाल तयार केला, त्यांनीच उत्तर देणे अपेक्षित आहे, अशी आमची मागणी आहे. त्यामुळे उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर ज्यांनी अहवाल तयार केला, त्यांनी दिले पाहिजे, याबाबत त्यांच्याकडे काही उत्तर आहे का?

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, विचार किंवा आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. आपले म्हणणे शासनास कळविण्यात येणार आहे. त्यावेळी श्री. राहूल जगताप, माजी आमदार यांनी मत मांडले की २-३ दिवस जनसुनावणी चालू ठेवण्यात यावी. प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत जनसुनावणी चालू ठेवावी.

त्यांनी पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की आपणास प्रश्नाचे उत्तर हे द्यावेच लागेल. त्यांनी मत मांडले की ईआयए अहवालावर जनसुनावणी आयोजित करणे अपेक्षित आहे. ईआयए अहवालातील गावांचे फोटो हे आपल्या गावातील नाहीत. त्यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस आवाहन केले की पर्यावरण सल्लागार यांनी काढलेल्या फोटोंबरोबर आपण आताच साईटवर जाऊ. तेथे लगचेच लक्षात येईल की हे फोटो खोटे लावलेले आहेत. फक्त तेथे जाण्यास पंधरा मिनिटे लागतात. जर फोटोच खरे नाहीत, तर कशाबाबत बोलायचे. याला उत्तर देण्यास जबाबदारी कोणाची आहे?

श्री राहूल जगताप यांनी विचारणा केली की ज्यांना सर्वेक्षण केले, ते कोठे आहेत व चुकीचे फोटो कोणी लावलेले आहेत? येथे श्री. कार्तिक शाहूराजे शिपलकर यांनी आक्षेप नोंदविला दोन्ही फोटोंचे अक्षांश व रेखांश जुळत नाहीत. दोन्ही फोटो मॅच होत नाहीत. त्यावेळेस काही स्थानिक स्टेजवर तर काही घोळक्याने खालून बोलत होते. सर्वजण फोटो दुसरीकडील लावले असे सांगत होते.

**श्री कार्तिक शाहूराजे शिपलकर** यांनी येथे बैठकीत सर्वांना सांगितले की फोटो चुकीचे लावलेले आहेत, त्यावेळी बरेच स्थानिक स्टेजवरुन व खालून फोटो चुकीचे आहेत म्हणून पर्यावरण सल्लागार यांनी दोष देत होते. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की अहवालात ज्या काही त्रुटी राहिलेल्या असतील, त्या दूर करण्यात येतील. तसेच आम्ही स्पष्टीकरण देण्यास बांधिल आहोत.

**४२) <u>श्री जितेंद्र अशोक मगर, रा. गार, ता. श्रीगोंदा.</u>** डालमिया भारतच्या सिमेंट प्रकल्पासाठी जे शेतकरी उपस्थित आहेत, त्यांना सांगू इच्छीतो की ज्यावेळी करोनाचा कहर होता, त्यावेळी शहरातील बरेचजण गावी गेले होते. त्यांनी शेती करण्यास सुरवात केली. येथील परिसरात भरपूर पाणी असून येथील शेतकरी सधन आहेत येथील ऊस उत्पादक, कापूस उत्पादक, ज्वारी उत्पादक आहेत. डालमिया प्रस्तावित सिमेंट प्रकल्पासाठी या परिसरातील ७५% पाण्याचा ऊपसा होणार आहे. तसेच प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे येथील परिसर प्रदूषित होणार आहे. तरी संपुर्ण प्रकल्प रद्द होणे गरजेचे आहे. सिमेंट उत्पादनामुळे प्रकल्प परिसरातील १० ते १५ कि.मी.

परिघात सर्वात जास्त प्रदूषण होते. या प्रकल्प प्रक्रियेमुळे भरपूर प्रमाणात उष्णता निर्माण होते. त्यामुळे प्रकल्प परिसरात परिणाम होणार आहे. तसेच प्रस्तावित सिमेट प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा परिसरातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयास मिळालाच नाही. त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल मिळालाच नाही म्हणून आक्षेप नोंदविलेले आहेत. तसेच सकाळी ११.०० वाजल्यापासून ही जनसुनावणी चालू आहे. बैठकीत प्रकल्प प्रवर्तकांना कुठल्याही प्रकारची उत्तरे देता आलेली नाहीत. तसेच प्रस्तावित प्रकल्पाविषयी कुठलीच जनजागृती करण्यात आलेली नाही. जर या प्रकल्पास मान्यता देण्यात आली, तर भविष्यात आम्हांला वाईट परिणामांना सामोरे जावे लागेल. तरी हा प्रकल्प रदद् करण्यात यावा.

४३) <u>श्री ऋषिकेश धनसिंग भोईटे, राहणार-सांगवी दुमाला, तालुका-श्रीगोंदा,</u> - माझी लहान मुलांची ५००-७०० मुलांची शिक्षणसंस्था आहे. शिक्षण संस्थेच्या १०० मीटरवर डालमिया कंपनी ही होणार आहे. आमचे गाव राष्ट्रपती पुरस्कार घोषित आहे. तर येथे पर्यावरण

विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सिंघमभाऊची भूमिका पाळा.

४४) **श्री विलासराव दत्तात्रय धुमाळ, माजी सैनिक, रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा, -** मी माजी सैनिक आहे, १९६२, १९६५, १९७१ च्या युध्दात माझा सहभाग होता. प्रस्तावित प्रकल्प स्थानापासून १५० मीटर अंतरावर माझा बंगला आहे. प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रात १,५००० लोक राहतात. २०० मीटर अंतरावर बालवाडी आहे, प्राथमिक शाळा आहे. तरी प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देऊ नये ही विनंती

४५) **श्री हरिष धुमाळ, राहणार- रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा.**

तुम्ही परवानगी द्या, देउ नका, कंपनी कोठे, शाळा कोठे, प्रकल्पाची जमिन जिरायती का बागायती हे पूर्णपणे तपासा, त्याचे संपूर्ण सर्वेक्षण करा, नंतरच परवानगी देण्यात यावी.

४६) **श्री भगवान माणिकराव चितळकर, माजी सरपंच, रा. निमगांव खलु, ता. श्रीगोंदा, -** प्रकल्प ज्या ठिकाणी होणार आहे, ती बागायती जमिन आहे. तर आम्ही आमची वडिलोपार्जित जमिन प्रकल्पास कशी देणार? आमची जमिन सुपीक आहे, त्यात विविध पीके घेतली

जातात. प्रस्तावित प्रकल्प स्थानाजवळ एक शाळा आहे. तसेच तेथे सरकारी जमिन आहे. सरकारी जमिनीवर प्रकल्प होऊ शकत नाही. तसेच तेथे लोकवस्ती जवळ आहे. तसेच जेव्हा आम्ही माहिती मागायचो, त्यावेळी योग्यप्रकारे माहिती देण्यातच आली नाही. तरी सर्व गोष्टींचा विचार करण्यात यावा.

४७) <u>ॲड. विठ्ठल काकडे, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा,</u> माझे दोन मुद्दे आहेत. या प्रकल्पाचे इतिवृत्त हे कधि मिळणार व त्यासाठी कोणाकडे अर्ज करावा लागेल. तसेच सकाळी ११.०० वाजल्यापासून ही जनसुनावणी चालू झालेली आहे. येथे महिलावर्गसुध्दा सकाळपासून आलेला आहे. कारण प्रस्तावित प्रकल्पामुळे त्यांना त्यांच्या संसाराची, शेतीवाडीची जी होळी होणार आहे, ती दिसत आहे.

बैठकीत एडव्होकेट आव्हाडसाहेबांनी मुद्दा उपस्थित केला की जर जमिनच नाही, तर प्रकल्पाचा अहवाल कसा सादर करण्यात आला? त्यांनी सांगितले की ही जनसुनावणी थांबविणे योग्य आहे. मात्र पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीने जनसुनावणी थांबविली नाही.

४८) **श्री मारुती बाजीराव ढगे (दादा ढगे), रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा -** आमचा संपूर्ण बागायती भाग आहे. येथील उपस्थित शेतक-यांचे वेगवेगळे क्षेत्र आहे आणि ते ५००, ७००, २००० टन ऊस पिकवित आहे. तर आमचा भाग हा जिरायती कसा? आम्ही बागायती शेतकरी आहोत. प्रगतीशील बागाईतदार म्हणून आम्ही घेतलेल्या उत्पादनामुळे मला २०१६ साली पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. माझा गट नं. २७५ आहे, मी वडिलोपार्जित जमिन विकणार नाही. मी हाडाचा शेतकरी आहे. शेतक-यांनी आपली जमिन देऊ नये. तरी या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

४९) **सौ. वैशाली सुनील, रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा -** या प्रकल्पाच्या २००-२५० मीटरवर माझे घर आहे. माझे लग्न झाले, तेव्हा हा फक्त बागायती पट्टा पाहूनच मला माझ्या वडिलांनी येथे लग्न लावलेले होते. आता येथे बैठकीत प्रस्तावित प्रकल्पामुळे आमचा बागायती पट्टा नष्ट होणार आहे, हे ऐकून वाईट वाटले. तरी आमच्या व आमच्या मुलांच्या भवितव्याच्या विचार करून

आम्हांला हा प्रकल्प अजिबातच नको. आमचा या प्रकल्पास विरोध आहे. तरी या प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये.

५०) **श्री मिलिंद सुरेश बारगळ, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य, रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा.** प्रस्तावित प्रकल्पापासून हवाई अंतर २००-३०० मीटर अंतरावर मी वास्तव्य करतो. मी व माझ्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे आमची शेती ही बाधित होऊ शकते. मी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असून, मी राहतो तेथे एक जिल्हा परिषद शाळा असून वस्तीस सुमारे २५ मुले आहेत. तेथे अंगणवाडी शाळा असुन तेथे मुले शिकतात. त्यांना प्रस्तावित प्रकल्पामुळे निश्चितच त्रास होऊ शकतो.

प्रकल्पाचा ७०० पानांचा इंग्रजी अहवाल ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध करण्यात आला. तो ग्रामपंचायत स्तरावर न समजणारा आहे. सदरहू अहवाल हा स्थानिक भाषेत मराठीत उपलब्ध करणे आवश्यक होते. शासनाचे निर्देश डावलून मराठीत अहवाल देण्याऐवजी कंपनीचा विचार करुनच इंग्रजी अहवाल देण्यात आला. त्याचा मी निषेध करतो. सादरीकरणातील पान नं. १० वर

विजेचा वापर लिहिलेला आहे. प्रस्तावित प्रकल्प प्रवर्तक आपल्या वीजेची गरज महाराष्ट्र शासनाच्या महावितरण कंपनी, दौंड उपकेंद्राकडून १३२ केव्हीए भागविणार आहेत. म्हणजे शेतक-यांच्या कृषिपंपाना जी वीज दिली जाते, त्यात कपात करुन ती प्रस्तावित कंपनीस देण्यात येणार आहे. त्यामुळे वीजपंपास वीज मिळणार नाही. त्याच पानावर प्रस्तावित प्रकल्पास पाण्याची गरज सांगितलेली आहे. ती ४९७.० केएलडी एवढी आहे. म्हणजे रोज सुमारे पाच लाख लिटर पाणी नदीतून उपसा होणार आहे. एवढे रोज पाणी प्रकल्पास लागेल. त्यामुळे शेतीला पाणीच राहणार नाही. आता सादरीकरणातील १२ नंबरचे पान. त्यात पावसाचे दिवस २० (वीस) सांगितलेले आहेत. हा आकडा अतिशय खोटा आहे. येथे जे पिढ्यानपिढ्या राहतात, त्यांना माहित आहे की ७०-८० दिवस पाऊस प्रत्यक्षात पडतो. आता १७ नंबरचे पान आहे. २०११ ची जनगणना आधारभूत घेण्यात आलेली आहे. २०११ ची जनगणना देऊन प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. तो आम्हांला मान्य नाही. २४ नंबरचे पान. आवाज बांधकामाच्या ठराविक कालावधी पुरताच मर्यादित

असेल. तर ठराविक कालावधी म्हणजे कोणता याबाबत येथे स्पष्टीकरण दिलेले नाही. ध्वनी प्रदूषणामुळे माणसात विशेषतः लहान मुलांमध्ये मानसिक विकृती येऊ शकते. त्यामुळे हा मुद्दा आम्हांला मान्य नाही. पान नं. ३२ - नैसर्गिक धोका - ड्रेनज पाईपलाईन ही पूर आल्यानंतर पूर्णपणे बंद (चोक अप) होणार आहे. कारखान्यातील दुर्गंधीमुळे स्थानिकांना त्याचा त्रास होणार आहे. तसेच मुसळधार पावसाची परिस्थिती हाताळण्यासाठी पावसाचे पाणी प्रकल्पातील साठवण्याच्या खड्ड्यामध्ये वळविण्यात येणार आहे. आमच्या विहिरी प्रकल्पापासून हवाई अंतराने २००-३०० मीटर दूर आहेत. सांडपाणी जमिनीत सोडणार असल्याने ते पाझरुन आमच्या विहिरीत येऊन आमच्या विहिरींचे पाणी दुषित होईल व आमच्या आरोग्यावर परिणाम होईल. तरी या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

५१) **<u>श्री संजय चितळकर, रा. चितळकर वस्ती, निमगाव खलू, ता. श्रीगोंदा</u>** - एक महिन्यापूर्वी हा प्रकल्प येतो. माझा गट नं. २७२ आहे. मी स्वतः खातेदार आहे. तर आमची वडिलोपार्जित जमिन हिसकावून घेणार आहेत का? या प्रकल्पाला आमचा पूर्ण विरोध

आहे. स्थानीक शेतक-यांना विनंती आहे की वडिलोपार्जित जमीनी मुलाबाळांसाठी ठेवाव्यात.

**५२) श्री कुंडलिक रंगनाथ भोसले, रा. निमगाव खलू, ता -श्रीगोंदा,-**

समोर बसलेल्या सर्वांना नमस्कार. मी पंधरा वर्षे सरपंच होतो. गेले काही वर्षे निमगाव खलू व परिसरातील इतर गावांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आमची शंभर टक्के बागायत असलेली जमिन उध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे. कंपनीच्या सातशे पानांच्या अहवालात कोणाची जमिन रेड झोन, तर कोणाची ग्रीन असे केलेले आहे. संपुर्ण ईआयए अहवाल हा इंग्रजीत असल्याने तो आमच्या ग्रामीण लोकांना समजत नाही. तरी अहवाल हा सोप्या भाषेत देण्यात यावा. भविष्यात अशा प्रकारची जनसुनावणी ही प्रत्येक बाधित गावात किंवा तेथील पंचायत समिती कार्यालयात घेण्यात यावी. या निमगाव खलू गावात संजयराव कुमार भोसले या नावाचे मोठे विद्यालय आहे. तेथे ४००-५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या विद्यालयाचा उल्लेख कुठेही ७०० पानी अहवालात करण्यात आलेला नाही. शेतक-यांच्या जमिन फसवून घेण्यात येऊ

नये. जर जमिन घेतली, तर जेसीबी लावून बांधकाम सुरु करताना त्या खड्ड्यातच शेतकरी उडया मारून आत्महत्या करतील, त्यात माझाही नंबर असणार आहे. या प्रकल्पास तीव्र विरोध.

**५३) श्री काशीनाथ भाऊ-**

प्रकल्पास तीव्र विरोध आहे, कारण या प्रकल्पाचा पशूपक्षी, माणसांना त्रास होणार आहे.

**५४) कुमारी -**

मी शाळेच्या मुलांतर्फे बोलणार आहे. जर सिमेंट प्रकल्प झाला, तर स्थानिक लोकांना श्वसनाचे आजार होतील. या प्रकल्पामुळे शेती नष्ट होणार आहे. शेती नष्ट झाली, तर आपण खाणार काय? शेतकरी हवाच आहे.

**५५) श्री. रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा -**

आमचे निमगाव खलू हे जिरायती गाव दाखविलेले आहे. मी श्रीगोंदा साखर कारखान्याचा संचालक आहे. कारखान्याचे गाळप हे सहा लाख टन आहे, तर त्यातील ३०,०००.० टन हे निमगाव

खलूचे आहे. मग माझे गाव बागायती का जिरायती? माझा या प्रकल्पास पूर्ण विरोध आहे. याची नोंद घेण्यात यावी.

**५६) श्री सचिन -----**

माझे पन्नास गुंठे क्षेत्र कॅनॉलमध्ये गेलेले आहे. आमच्या गावातून भीमा नदी वाहते. आमच्या गावातून सर्व लोक आलेले आहेत. उपस्थित श्री विनायक मगर यांनी कर्जवाटपाची रक्कम वाचून दाखविली, तर ती जिरायती क्षेत्राला केली असती का? या प्रकल्प अधिका-यांनी लोकांची दिशाभूल केलेली आहे. आमच्या गावात रोजचे ३५,००० लिटर दुध संकलन आहे. शेतकरी कधिही खोटे बोलत नाही. या कंपनीस परवानगी दिल्यास शेतक-यांचा तोटा होणार आहे. पशूपालनात अडचणी येणार आहेत.

**५७) श्री. अनिल महादेव मगर, रा. गार, ता. श्रीगोंदा:-** ज्या प्रस्तावित प्रकल्पाची जमिनच नाही, तर त्याची जनसुनावणी कशी आयोजित करण्यात आली? आपणास न्याय दयायचा आहे. तरी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की कोणाचाही दबावाला बळी पडू नये. हे ३,५०,००० लाख लोकवस्ती असलेले गाव

आहे. कंपनीचा ईआयए अहवाल हा पुर्णपणे बेकायदेशीर आहे. आम्ही ही कंपनी होऊच देणार नाही, म्हणजे नाहीच.

५८) <u>श्री नीतीन कोंडाजी थोरात, रा. कौठा, ता. श्रीगोंदा -</u> कारण हा प्रकल्प जास्त उष्णतेचा असल्याने पाण्याचे प्रमाण कमी होईल. आमच्या विहीरी, बोअरवेल्स कोरड्या पडतील. पाण्याचे, हवेचे प्रदूषण होईल. तरी आमच्या गावाची विनंती आहे की हा प्रकल्प येथे होऊ नये.

५९) <u>श्री राजेंद्र सोनावणे, रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा -</u> प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी खरा अहवाल केला नाही. जर त्यांनी खरा अहवाल केला असता, तर मी तुमच्या बाजूने बोललो असतो. येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी योग्य प्रकारे उत्तर देणे अपेक्षित होते. येथे उपस्थितांनी प्रकल्पास विरोध केला, कारण आपण योग्यप्रकारे अहवाल केला नाही. येथील प्रत्येक गावाचा एक माणूस निवडून त्यांची वेगळी बैठक घेण्यात यावी. प्रकल्प हा शेतक-यांच्या हिताचाच असावा. शेतक-यांचे ७/१२ चे गट नंबर कंपनीने स्वतःच्या नावावर

Shinde

लिहिले, यासारखे दुर्दैव नाही. मात्र आपण ती चूक मान्य केली, म्हणून आम्हांला बरे वाटले.

६०) **श्री. रफिक इनामदार, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा, -** डालमिया भारताच्या प्रस्तावित सिमेंट प्रकल्पाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीस जवळजवळ दहा गावातील ग्रामस्थ हरकती नोंदविण्यासाठी सकाळी ११.०० वाजल्यापासून आलेले असून अजूनही कार्यक्रम चालू आहे. या जनसुनावणीत मी काष्टी गावचा ग्रामस्थ व शेतकरी म्हणून सूचना करतो की बैठकीत ज्या हरकती, आक्षेप नोंदविण्यात आले, त्यातून दिसून येते की या शेतक-यांच्या मुलांनी उपस्थित केलेल्या हरकती आक्षेपांना कंपनीचे अधिकारी हे उत्तर देऊ शकले नाही. कारण शेतक-याची मुले अभ्यासू व कष्टाळू आहेत. ज्यांनी अभ्यास करुन आक्षेप नोंदविले, त्यांचे अभिनंदन. या प्रकल्पाच्या विरुध्द आम्ही सुप्रीम कोर्टात जाणार असून तेथे कंपनी प्रशासन टिकू शकत नाही. तरी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती की व्यर्थ

खर्च करु नका. तुमचा प्रदूषणकारी प्रकल्प आम्ही येथे होऊ देणार नाही.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रकल्पाबाबत सांगितलेले मुद्दे व विरोध करताना सांगितलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ज्यांना लेखी स्वरुपात सूचना, आक्षेप सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यात यावे. सर्वांनी आपले मुद्दे व्यवस्थित मांडले, त्याबद्दल सर्वांचे आभार मानून ही जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

बैठकीचा समारोप करताना मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सुचना, विचार, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. व सदर इतिवृत्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे ते पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती त्याबाबत

योग्य तो निर्णय घेईल. मा. अध्यक्ष यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत जनसुनावणीपुर्वी ३२५, जनसुनावणीच्या वेळी ८३८ व जनसुनावणी नंतर १८ असे एकुण - **११८१** प्राप्त झालेल्या तसेच ईमेलद्वारे **हरकती/सुचना** जोडलेल्या आहेत.

**(चंद्रकांत शिंदे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहिल्यानगर.

**(लिंबाजी भड)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक.

**(अरुण उंडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
अपर जिल्हादंडाधिकारी
अहिल्यानगर.